## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०३.०१.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.

मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ४४ वी बैठक बुधवार दिनांक ०३.०१.२०१८ रोजी सकाळी ११.०० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ. तथा मा. मंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण). |
| २. | श्री. राजेश कुमार | मा. प्रधान सचिव (कामगार)- निमंत्रित |
| ३. | श्री. एन. के. पोयाम | मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी) |
| ४. | श्री. जयगोपाल मेनन | मा. संचालक व लेखा कोषागारे (शासकीय प्रतिनिधी) |
| ५. | श्री. शशांक साठे | मा. उपसचिव -कामगार (शासकीय प्रतिनिधी) |
| ६. | श्रीमती वेदा आगटे | मा. मालक प्रतिनिधी |
| ७. | श्री. श्रीपाद कुटासकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. विजय देवरुखकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| ९ | श्री. अशोक भुताड | मा. कामगार प्रतिनिधी |
| १० | श्री. श्री. चु. श्रीरंगम | सचिव महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदयांचे व सर्व उपस्थितांचे स्वागत व नववर्षाच्या शुभेच्छा देवून मंडळ बैठकीत प्रथमच उपस्थितीत मा. कामगार आयुक्त श्री. एन. के. पोयाम व मा. संचालक व लेखा कोषागारे श्री. जयगोपाल मेनन यांना परिचय करून देण्यास विनंती केली. सदर परिचयानंतर बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीच्या इतिवृततांची प्रत सर्व उपस्थितांना वाटप करण्यात आला.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

## बैठकीचे इतिवृतांत

**विषय क्र. १: मागील बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

मंडळाच्या दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांत मंडळ सचिव यांनी वाचुन दाखविले व ठरावनिहाय केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल मंडळास सादर केला. सदर इतिवृत्तात काही बदल करावयाचे असल्यास त्यासह इतिवृत्त कायम करणे प्रस्तावित आहे, अशी विनंती मंडळ सचिव यांनी केली.

मंडळाच्या दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाच्या दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** |
| **कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र. २: कौशल्य वृद्धीकरण योजनेअंतर्गत (RPL) प्रशिक्षणाच्या सन २०१७-१८ च्या सुधारित दरास व असेसिंग बॉडीज् (Assessing Bodies) सोबत करावयाच्या MOU च्या प्रारुपास मान्यता देणे.**

याविषयी मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, बांधकाम क्षेत्रातील कामगारांची उत्पादन क्षमता आणि रोजगार क्षमता वाढविण्यासाठी संघटीत तसेच असंघटीत क्षेत्रातील बांधकाम कामगारांच्या कौशल्याचा शोध घेणे. कौशल्य् वृध्दी करणे व प्रमाणित करणे तसेच, प्रत्यक्ष कामाच्या अनुभवातून कौशल्य् धारण केलेल्या उमेदवारांच्या कौशल्याचे प्रमाणिकरण करणे. तसेच राज्यातील विविध उद्योगांना कुशल मनुष्य् बळाचा पुरवठा व्हावा या हेतुने केंद्र शासनाने या मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांकरीता कौशल्य वृध्दी योजना (Recognition of Prior Learning (RPL) Of Construction Workers) लागू केली आहे. केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनिमय व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम ६० अन्वये Operation Manual द्वारे मार्गदर्शक तत्वे निश्चित करुन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व राज्यांना कळविले आहे. त्याकरीता केंद्र शासनाने एम्पॅनल केलेल्या खालील नमूद ट्रेनिंग प्रोव्हायडर्स आणि असेसिंग बॉडिज यांना महसूल विभाग निहाय नियुक्त करण्यास राज्य् शासनाने त्यांचे पत्र क्र. इबाकां २०१६/ प्र.क्र.३५७/काम -७ /दि. २७.०२.२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

| अनु क्र. | महसूल विभाग | ट्रेनिंग प्रोव्हायडर्स | असेसिंग बॉडिज |
|---|---|---|---|
| १ | कोकण विभाग | Labournet Services India Pvt.Ltd., Banglore. | India Skills, New Delhi. |
| २ | पुणे विभाग | IL&FS Skills, Noida. | India Skills, New Delhi. |
| ३ | नाशिक विभाग | G&G Skills Developers (P) Ltd, Panchkula. | AKG, Chandigarh. |
| ४ | नागपूर विभाग | Sushil Bahuuddeshiya Shikshan Sanstha, Nagpur. | Shiksha Bharti, New Delhi. |
| ५ | औरंगाबाद विभाग | Bhaskar Foundation, Delhi. | Virtual Education Trust. |

शासन मान्यतेस अनुसरून मंडळाच्या दिनांक २८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत RPL योजना राबविण्याबाबत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :** नोंदित बांधकाम कामगारांच्या कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेबाबत ट्रेनिंग प्रोव्हायडर्स (Training Providers) यांचेशी करारनामा करुन त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात यावेत तसेच नियुक्ती करण्यात आलेल्या एजन्सीला कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेअंतर्गत जास्तीत जासत लक्षांक देण्यात येऊन लक्षांक पुर्ती करून घेण्यात यावी, तसेच Assesment चे सुध्दा कामकाज संबंधित संस्थेकडून करून घेण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ लेबर अॅन्ड एम्प्लॉयमेंट विभागाच्या अधिनस्त् असलेल्या Director General of Employment and Training (DGET) संचालनालयाने माहे डिसेंबर २०१४ मध्ये सदर योजनेसाठी ऑपरेशन मॅन्युअल तयार केलेले आहे. सदर मॅन्युअल मधील अटी, शर्ती व मंडळाच्या मंजूर ठरावानुसार संबंधित ट्रेनिंग प्राव्हायडर्स सोबत दिनांक १६.०३.२०१७ रोजी सामंजस्य करार (MOU) करण्यात आला. तथापि, मंडळाने नियुक्त केलेल्या असेसिंग बॉडिज् सोबत करारनामा करण्यात आलेला नाही.

मंडळामार्फत नियुक्त ट्रेनिंग प्रोव्हायडर्स यांनी दिनांक ३०.११.२०१७ पर्यत प्रशिक्षणाबाबत केलेल्या कार्यवाहीची स्थिती सोबतच्या विवरणपत्रात सादर करण्यात येत आहे.

सन २०१४-१५ च्या ऑपरेशन मॅन्युअलमधील मुद्दा क्र.९.६ अन्वये ट्रेनिंग प्रोव्हायडर्स व असेसिंग बॉडीज् यांना प्रशिक्षण खर्चाचे देयक मंडळास सादर करणेबाबत खालील सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१. RDAT ने प्रशिक्षणाचा निकाल घोषित केल्यानंतर प्रशिक्षणार्थींच्या उपस्थितीसह ट्रेनिंग प्रोव्हायडर्स प्रशिक्षणाच्या खर्चाचे देयक मंडळास सादर करतील.
२. ट्रेनिंग प्रोव्हायडर्स रु.२७.५० प्रति तास प्रति प्रशिक्षणार्थी या दराने खर्चाच्या प्रतिपूर्तिचे देयक मंडळास सादर करतील. तसेच प्रशिक्षणाच्या दरामध्ये प्रत्येक आर्थिक वर्षाच्या १ एप्रिल पासून रु.२.५० ने वाढ करण्यात येईल.
३. प्रशिक्षणार्थीच्या पगार नुकसान भरपाई म्हणून ट्रेनिंग प्रोव्हायडर्स रु. ३५ प्रति तास प्रति प्रशिक्षणार्थी या दराने प्रतिपूर्तिचे देयक मंडळाकडे सादर करतील.

४. RDAT ने प्रशिक्षणाचा निकाल घोषित केल्यानंतर प्रशिक्षणार्थींच्या उपस्थितीसह असेसिंग बॉडीज् प्रशिक्षणाच्या खर्चाचे देयक मंडळास सादर करतील.

५. असेसिंग बॉडीज् रु. १०००/- प्रति प्रशिक्षणार्थी या दराने प्री असेसमेंट आणि अंतिम असेसमेंट साठी रु. १०००/- असे एकूण रु. २०००/- असेसमेंट फी आकारेल.

६. वरील प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर मंडळ १५ दिवसात सदर देयक अदा करेल.

ट्रेनिंग प्रोव्हायडर्सने व असेसिंग बॉडीजने सादर केलेल्या प्रशिक्षणाच्या खर्चाच्या देयकाची प्रतिपूर्ती मंडळाने करण्यापूर्वी सदर देयकांची क्षेत्रिय कार्यालयांकडून तपासणी होणे आवश्यक आहे. सदर देयके सहाय्यक कामगार आयुक्तांनी प्रमाणित करून अप्पर कामगार आयुक्त किंवा कामगार उप आयुक्त यांच्या शिफारसींसह मंडळाकडे सादर करणेबाबत मंडळाने दिनांक २९.०५.२०१७ व १६.११.२०१७ अन्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविलेले आहे.

ट्रेनिंग प्रोव्हायडर्स संस्था सोबत दिनांक १६.०३.२०१७ रोजी सामंजस्य करार करताना RPL (Recognition of Prior Learning Of Construction Workers) च्या ऑपरेशन मॅन्युअल मधील मुद्दा क्र. 9.6 (b) नुसार प्रतिवर्ष रु. २.५० प्रति तास प्रति लाभार्थी वाढ न देता माहे डिसेंबर २०१४ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या दराने सांमजस्य करार करण्यात आला. केंद्र शासनाच्या ऑपरेशन मॅन्यअल नुसार दरवर्षी रु. २.५० ची वाढ मिळणेबाबत मे. भास्कर फाऊंडेशन -दिल्ली (औरंगाबाद विभाग), आय.एल्. ॲन्ड एफ एस स्कील्स्-नोएडा (पुणे विभाग), यांनी विनंती केलेली आहे. केंद्र शासनाच्या माहे डिसेंबर २०१४ च्या मॅन्युअल नुसार खालीलप्रमाणे वार्षिक दरवाढ देय आहे.

| अ.क्र. | वर्ष | प्रति तास प्रति प्रशिक्षणार्थी वार्षिक वाढ | प्रति तास प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय दर |
|---|---|---|---|
| १ | २०१४-१५ | - | २७.५० |
| २ | २०१५-१६ | २.५० | ३०.०० |
| ३ | २०१६-१७ | २.५० | ३२.५० |
| ४ | २०१७-१८ | २.५० | ३५.०० |

उपरोक्त संस्थांनी केलेल्या विनंतीस अनुसरुन दिनाक १ एप्रिल २०१७ पासून रु.३५ प्रति तास प्रति प्रशिक्षणार्थी या दराने सुधारीत सांमजस्य करार करून त्यानुसार प्रशिक्षणाची देयके अदा करणे प्रस्तावित आहे.

केंद्र शासनाच्या माहे डिसेंबर २०१४ च्या मॅन्युअल मधील मुद्या क्र. 9.6 (e) नुसार असेसिंग बॉडींजना प्री असेसमेंटसाठी रु. १०००/- आणि अंतिम असेसमेंट साठी रु. १०००/- असे एकूण रु. २०००/- प्रति प्रशिक्षणार्थी प्रमाणे देय रक्कमेबाबत केंद्र शासनाच्या पॅनलवरील ९ संस्थापैकी मंडळाने प्रस्तावित केलेले व शासनाच्या दिनाक ०४.१२.२०१७ च्या पत्रान्वये RDAT, मुंबई यांच्याकडे शिफारस केलेल्या खालील ५ संस्थांसोबत सामंजस्य करार (MOU) करणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | मंडळ / शासनाने शिफारस केलेली असेसिंग बॉडी |
|---|---|
| १ | India Skills, New Delhi |
| २ | Engineering College Staff India (ECSI) Hydrabad |
| ३ | Virtual Education Trust Assessing Body, New Delhi. |
| ४ | Navriti Technologies Pvt Ltd Banglore |
| ५ | AKG, Chandigarh |

सदर सामंजस्य कराराचे प्रारुप सोबत सादर करण्यात येत आहे. मंडळाच्या मान्यतेअंती त्यानुसार सामंजस्य करार (MOU) करण्यात येईल .

केंद्र शासनाच्या ऑपरेशन म्यॅनुअलमधील मुद्या क्र. 9.6 (c) अन्वये देय वेतन नुकसान भरपाई (Compensation of Wage Loss) प्रति प्रशिक्षणर्थी प्रति तास रु. ३५/- प्रमाणे देय आहे.

ट्रेनिंग प्रोव्हाडर्स सोबत करण्यात आलेल्या सामंजस्य करारानुसार २०० पेक्षा जास्त् बांधकाम कामगार असलेल्या बांधकाम ठिकाणाची निवड करून त्या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र उभारणे आवश्यक आहे. तथापि, प्रत्यक्ष प्रशिक्षण सुरु झाल्यानंतर असे निदर्शनास येत आहे की, २०० पेक्षा जास्त बांधकाम कामगार असलेल्या बांधकाम ठिकाणाची संख्या अत्यल्प आहे त्यामुळे ट्रेनिंग प्रोव्हाडर्स संस्थांकडून निवड केलेल्या कमी कामगार संख्या असलेल्या बांधकाम कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठी ३ ते ४ लहान बांधकाम ठिकाणांकरिता १ स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र स्थापन करावे. सदर प्रशिक्षण केंद्र अंगणवाडी केंद्र/ समाजकल्याण केंद्र/ शाळेची इमारत, इत्यादी ठीकाणी उभारुन प्रशिक्षण देण्यास मान्यता देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

ट्रेनिंग प्रोव्हाडर्स संस्थांकडून देण्यात येत असलेले प्रशिक्षण व असेसिंग बॉडीजकडून करण्यात येत असेलेल्या असेसिंगबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

१. ट्रेनिग प्रोव्हाडर्स संस्थांसोबत दिनांक १६.०३.२०१७ रोजी करण्यात आलेल्या सामंजस्य करार (MOU) मध्ये सुधारणा करून केंद्र शासनाच्या माहे डिसेंबर २०१४ मधील मॅन्युअल मधील मुद्या क्र. ९.६ (b) अन्वये सन २०१७-१८ या चालु वित्तीय वर्षाकरीता देय प्रशिक्षणाची प्रति तास रु. ३५/- प्रमाणे प्रशिक्षण खर्च व आगामी वर्षाच्या १ एप्रिल पासुन वार्षिक वाढ रु. २.५० प्रमाणे मंजूर करणे.

२. केंद्र शासनाच्या माहे डिसेंबर २०१४ मधील मॅन्युअल मधील मुद्या क्र. ९.६ (e) अन्वये मंजूर दराने केंद्र शासनाच्या पॅनलवरील ९ संस्थापैकी मंडळाने प्रस्तावित केलेले व शासनाच्या दिंनाक ०४.१२.२०१७ च्या पत्रान्वये RDAT, मुंबई यांच्याकडे शिफारस केलेल्या ५ संस्थांसोबत असेसिंग बॉडीजसोबत सामंजस्य करार (MOU) करणे.

३. केंद्र शासनाच्या माहे डिसेंबर २०१४ मधील मॅन्युअल मधील मुद्या क्र. ९.६ (c) अन्वये मंजूर दराने प्रति प्रशिक्षणार्थी प्रति तास रु. ३५/- या दराने देय वेतन नुकसान भरपाई (Compensation Wage Loss) जिल्हा कार्यालयामार्फत संबंधित बांधकाम कामगारांनी अदा करणे.

४. २०० बांधकाम कामगारापेक्षा कमी बांधकाम कामगार असलेल्या बांधकामाच्या ठिकाणाकरीता स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र स्थापन करून जिल्हा कार्यालयाने मंजूर केलेल्या यादीतील बांधकाम कामगारांना RPL प्रशिक्षण देणे.

क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झालेली RPL प्रशिक्षण खर्चाची देयके सरकारी कामगार अधिकारी/ सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या तपासणीअंती व अप्पर कामगार आयुक्त / कामगार उप आयुक्त यांच्या शिफारशीनंतर मंडळ स्तरावरुन अदा करण्यात येतील.

मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय (कामगार) यांनी असे सुचित केले की, RPL प्रशिक्षण देण्यासाठी ज्या असेसिंग बॉडिजना नियुक्त करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण संस्थांनी केलेल्या प्रशिक्षणाच्या कामाचा आढावा मंडळाने घ्यावा. तसेच असेसिंग बॉडीजची

जबाबदारी निश्चित करण्यात यावी. सदर संस्थेने किती दिवसात किती कामगारांना काय प्रशिक्षण द्यावे याबाबत मंडळाने ठरवून तशा सुचना सदर संस्थांना द्याव्या. तसेच मंडळाने कौशल्य विकास योजनेअंतर्गत अटी शर्ती ठरवून तसे MSSDS ला कळविणे व त्याप्रमाणे कौशल्य वृद्धी करण्याबाबत कळविण्यात यावे. त्यास मंडळ सचिव यांनी सहमती दर्शविली.

तसेच मा. कामगार प्रतिनिधी कुटासकर यांनी RPL योजनेअंतर्गत कामगारांना प्रशिक्षण पुर्ण झाले याची खातरजमा करण्यात येते का किंवा कामगारांना प्रशिक्षण देण्यात येते किंवा कसे याबाबत विचारणा केली. यावर मंडळ सचिव यांनी असे स्पष्ट केले की, ट्रेनिंग प्रोव्हाडर्स ने किती कामगारांना ट्रेनिंग दिले याबाबत असेसिंग करण्यासाठी असेसिंग बॉडिज् ची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांच्यामार्फत असेसमेंट केले जाते.

यावर मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी सदर ट्रेनिंग संस्था कोण निश्चित करते अशी विचारणा केली असता RDAT च्या पॅनलवरील पाच संस्था प्रत्येक विभागासाठी नियुक्त करण्यात आल्या असल्याचे मंडळ सचिव यांनी सादर केले व ट्रेनिंग प्रोव्हायडर्सकडून साईट निश्चित करून प्रशिक्षण केंद्राची स्थापना करणे व प्रशिक्षणासाठी निवडलेल्या प्रशिक्षणार्थींची यादी RDAT कडे मंजूरीसाठी पाठविण्यात येते. त्यानंतर RDAT सदर साईटवर प्रि असेसमेंट करण्यासाठी असेसमेंट बॉडीज नियुक्त् करते. असेसिंग बॉडिजने प्रशिक्षणाकरीता पात्र ठरविलेल्या प्रशिक्षणार्थीना ट्रेनिंग प्रोव्हडर्स प्रशिक्षण देतात. सदर प्रशिक्षणाअंती असेसिंग बॉडीज प्रशिक्षणार्थींचे मुल्यमापन करून त्यांच्या चाचणीचे निकाल ट्रेनिंग प्रोव्हाडर्स पोर्टलवर अपलोड करून ते मंडळास सादर करतात, अशी कार्यप्रणाली आहे . परंतू RDAT कडून मंजूरी मिळण्यास विलंब होतो असेही मंडळ सचिव यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच ट्रेनिंग प्रोव्हाडर्स मार्फत ट्रेनिंग पुर्ण केलेल्या कामगारांसाठी वेगळी योजना राबविण्यात यावी व सदर ट्रेनिंग देताना आस्थापानांही सहभागी करून घेण्यात यावे असेही मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी सुचित केले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

मा. कामगार प्रतिनिधी श्री. कुटासकर यांनी ट्रेनिंग प्रोग्राममध्ये आस्थापनांचाही समावेश करण्यात यावा, असे सुचविले. यावर सचिव यांनी सदर ट्रेनिंग प्रोग्रामध्ये आस्थापानांचाही समावेश असतो असे सर्व उपस्थितांना अवगत केले.

मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी प्रशिक्षणार्थींना वेतन नुकसान भरपाई देण्यात यावी, असे सुचविले. त्यावर मा. प्रधान सचिव यांनी ट्रेनिंग पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थींना सदर रक्कमी देण्यात यावी असे सुचविले. मा. कामगार प्रतिनिधी श्री. कुटासकर यांनी एखादा कामगार स्वत: ट्रेनिंग घेण्यास इच्छूक असेल तर त्याबाबत त्याने कोठे अर्ज सादर

करावा अशी विचारणा केली असता मंडळ सचिव यांनी सदर कामगाराने सरकारी कामगार अधिकाऱ्याकडे अर्ज केल्यास सदर कामगाराचा ट्रेनिंगमध्ये समावेश करून घेण्यात येईल असे स्पष्ट केले.

याबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: १. ट्रेनिग प्रोव्हाडर्स संस्थांसोबत दिनांक १६.०३.२०१७ रोजी करण्यात आलेल्या सामंजस्य करार (MOU) मध्ये सुधारणा करून केंद्र शासनाच्या माहे डिसेंबर २०१४ च्या मॅन्युअल मधील मुद्या क्र. 9.6 (b) अन्वये सन २०१७-१८ या चालु वित्तीय वर्षाकरीता देय प्रति तास रु. ३५/- प्रमाणे प्रशिक्षण खर्च व आगामी वर्षाच्या १ एप्रिल पासुन वार्षिक वाढ रु. २.५० प्रमाणे सुधारित करारनामा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**२. केंद्र शासनाच्या माहे डिसेंबर २०१४ मधील मॅन्युअल मधील मुद्या क्र. 9.6 (e) अन्वये मंजूर दराने केंद्र शासनाच्या पॅनलवरील ९ संस्थापैकी मंडळाने प्रस्तावित केलेले व शासनाच्या दिनाक ०४.१२.२०१७ च्या पत्रान्वये RDAT, मुंबई यांच्याकडे शिफारस केलेल्या ५ असेसिंग बॉडीजसोबत सामंजस्य करार (MOU) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**३. केंद्र शासनाच्या माहे डिसेंबर २०१४ च्या मॅन्युअल मधील मुद्या क्र. 9.6 (c) अन्वये मंजूर दराने प्रति प्रशिक्षणार्थी प्रति तास रु. ३५/- या दराने देय वेतन नुकसान भरपाई (Compensation Wage Loss) जिल्हा कार्यालयामार्फत संबंधित बांधकाम कामगारांनी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**४. ज्या बांधकामाच्या ठीकाणी २०० पेक्षा कमी बांधकाम कामगार काम करतात अशा बांधकामाच्या ठिकाणावरील बांधकाम कामगाराच्या प्रशिक्षणाकरीता आंगणवाडी केंद्र / समाजकल्याण केंद्र/ शाळेची इमारत/ अन्य इमारती मध्ये येथे स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र स्थापन करून जिल्हा कार्यालयाने मंजूर केलेल्या यादीतील बांधकाम कामगारांना RPL चे प्रशिक्षण देण्यासही मान्यता देण्यात येत आहे.**

५. क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झालेली RPL प्रशिक्षण खर्चाची देयके सरकारी कामगार अधिकारी/ सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या तपासणीअंती व अप्पर कामगार आयुक्त / कामगार उप आयुक्त यांच्या शिफारशीनंतर मंडळ स्तरावरुन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरिलप्रमाणे ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार |
| कल्याणकारी मंडळ, मुंबई | कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र. ३: मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजना व बांधकाम कामगारांच्या नोंदणीत वाढ करण्यासाठी करावयाच्या प्रसार व प्रसिद्धीच्या वार्षिक आराखड्यास मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, केंद्र शासनाने योजनांचा प्रसार प्रसिध्दी करण्याकरीता इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) १९९६ अधिनियमातील कलम ६० नुसारवेळोवेळी निर्देश दिलेले आहे. केंद्र शासनाच्या दि.२३.०९.२०१५ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहे. (दि.२३.०९.२०१५ व दि.०९.०९.२०१५ रोजीच्या केंद्र शासनाच्या आदेशाची प्रत सोबत संलग्न)

"It has been observed by the Hon'ble Supreme Court in W.P. (Civil) No.318 of 2006 that the expenditure incurred by some of the state Governments/ Union Territories is on advertisements and the Hon'ble Court directed that the amounts so spent should be returned to the accounts of BOCW Cess fund. State welfare Boards constituted under section 18 of the BOCW (RECS) Act, 1996 shall ensure that the Cess money collected under section 3 of the BOCW welfare Cess Act,1996 is utilized only for the pupose(s) specified under section 22 of the BOCW Act,1996. In case any amount of Cess fund collected under BOCW welfare Cess Act ,1996 has been utilized for any purpose other than mandated under Section 22 of the BOCW (RECS)Act, 1996, it shall be the resposiblity of the State Government/UT Administration concerned to recoup such amount into the cess fund on immediate basis and furnish compliance report to this Ministry. This is in addition to the directions given in para 5 of the Order u/s 60 of BOCW Act, dated 09.09.2015 cited above."

तथापि, केंद्रशासनाच्या दि.०८.१०.२०१५ रोजीच्या आदेशातील मुद्या क्र.०३ अन्वये जनजागृती, प्रसार व प्रसिध्दीबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

"The Board shall be competent to spend money on publicity and awareness generation through press and media under section २२ (h) of the Act. However, expenditure on such campaigns or activities shall be justified to the extent it focuses on BOC workers only."

देशपातळीवरील National Sample Survey office (NSSO) एनएसएसओ या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात २०१५-२०१६ अखेर सुमारे २७.५३ लक्ष बांधकाम

कामगार असून माहे संप्टेबर २०१७ पर्यंत ६.२३ लक्ष बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली असून ३.१२ लक्ष बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत आहे. माहे संप्टेबर २०१७ पर्यंत मंडळाच्या विविध योजनांचा लाभ ४.४९ लक्ष बांधकाम कामगारांना देण्यात आला असून योजनांवरील खर्च केवळ रू.२४१ कोटी एवढा आहे. मंडळाकडे माहे संप्टेबर २०१७ पर्यंत जमा उपकर रक्कम रू.५६८५.३२ कोटी च्या तुलनेत योजनांवरील खर्च अत्यल्प आहे. मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविणेबाबत मा. सर्वोच्च् न्यायालय, केंद्र शासन व राज्य शासनामार्फत वारंवार निर्देश देण्यात येत आहे. विधानमंडळाच्या अधिवेशनातही विविध आयुधाद्वारे विचारणा करण्यात आलेल्या मुद्यांमध्ये बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविणे व लाभ वाटप करणेबाबत विचारणा करण्यात येत आहे. बांधकाम कामगारांच्या नोंदणीमध्ये वाढ करण्यासाठी व मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ बांधकाम कामागारापर्यंत पोहचविण्यासाठी जनजागृती, प्रसार व प्रसिध्दीच्या विविध माध्यमांचा वापर करून बांधकाम कामागरांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे.

मंडळामार्फत बांधकाम कामगारांना नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती, प्रसार व प्रसिध्दीबाबतचा एकत्रित वार्षिक आराखडा तयार करणेबाबत प्राप्त शासननिर्देश व त्यास अनुसरून मंडळाच्या दि.२२.०९.२०१७ रोजीच्या मंडळाच्या बैठकीत सादर विषयावर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :- मंडळामार्फत विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती मोहीम राबविण्यासाठी इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीची आवश्यकताआहे. मंडळास यांनतरही वेळोवेळी करावयाच्या प्रसिध्दीसाठी अशा संस्थांची गरज भासणार आहे. यास्तव माहिती व जनसंपर्क विभागामार्फत दर्शनी जाहिराती तयार करणे, वितरीत करणे, मोहिम आखणे व अंमलबजावणीचे कामाबाबत निश्‍चित कार्यपध्दतीची माहिती प्राप्त करावी व त्यानुसार कार्यवाही करावी. माहिती व जनसंपर्क विभागाने निश्‍चित केलेल्या पॅनेलवरील संस्थामार्फत प्रथम टप्प्यात प्रस्तावित रू.१० कोटी व भविष्यातील विविध माध्यमाद्वारे करावयाच्या प्रसिध्दीची कार्यवाही करण्यात यावी. तसेच शासन निदेशानुसार जनजागृतीचा एकत्रित वार्षिक आराखडा तयार करून शासन मान्यतेस सादर करावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

अ) **मंडळाच्या योजनांची जनजागृती, प्रसार व प्रसिध्दीकरीता एकत्रित वार्षिक आराखडा**

मंडळाच्या योजनांची जनजागृती, प्रसार व प्रसिध्दीकरीता एकत्रित वार्षिकआराखडा तयार करणेबाबत शासनाच्या निर्देशास अनुसरून मंडळाने पारित केलेल्या उपरोक्त ठरावानुसार वार्षिक आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

मंडळाच्या योजनांची जनजागृती. प्रसार व प्रसिध्दीच्या एकत्रित वार्षिक आराखडयामध्ये वर्तमान पत्र, दूरदर्शन, रेडिओ, चित्रपट गृह, होर्डींग्ज, बेस्ट बसेस, एस टी बसेस, बस स्टँडवरील घोषणा, मोबाईल व्हॅन, डिजीटल वॉल, पथनाटय, भितीपत्रक, कामगार मेळावे, एलईडी व्हॅन इ. माध्यमांद्वारे योजनांची जनजागृती, प्रसार व प्रसिध्दी करणे प्रस्तावित आहे. प्रस्तावित माध्यमाद्वारे करावयाच्या प्रसार व प्रसिध्दीचे वार्षिक परिमाण व अपेक्षित खर्चाचा तपशील तसेच दरमहा नियोजनाचा आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती, प्रसार व प्रसिध्दीकरीता बाबनिहाय रू. २५.०६ कोटीचा वार्षिक आराखडा तयार करण्यात आला आहे व शासन निर्देशानुसार मंडळाच्या दि.१६.१२.२०१७ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात आला आहे.

- मंडळाच्या विविध योजनांची जनजागृती. प्रसार व प्रसिध्दी करीता प्रस्तावित बाबनिहाय वार्षिक खर्च रू.२५.०६ कोटीच्या वार्षिक आराखडयास शासन मान्यता प्रदान करावी.
- मंजूर वार्षिक आराखडयाच्या मर्यादेत बाबनिहाय खर्चात बदल करण्याचे अधिकार मंडळास प्रदान करावे.
- जनजागृती, प्रसार व प्रसिध्दीवर होणारा खर्च मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांवर खर्ची टाकण्यासही शासन मान्यता प्रदान करण्यात यावी.

**ब) एकल स्त्रोत खरेदी**

महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४ दि.०१.१२.२०१६ मधील "शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका" यात नमूद परिच्छेद क्र.३.२.६ – एकल स्त्रोत खरेदी मधील मुद्या क्र अ नुसार- खरेदीच्या वस्तू एका विशिष्ट विक्रेत्याकडे उपलब्ध असते किंवा खरेदीच्या विषयाच्या संदर्भात फक्त विशिष्ट विक्रेत्याला अधिकार असतात ज्यामुळे अन्य कोणताही किंवा बदली पर्याय उपलब्ध नसतो व अन्य

कोणत्याही खरेदी पध्दतीचा अवलंब करणे शक्य नसते. अशा वेळी खरेदी प्राधिकाऱ्याने एक स्त्रोताकडून खरेदी करण्याची गरज आणि परिस्थिती आणि या पध्दतीमुळे अन्य पध्दतीच्या माध्यमातून खरेदी करण्यापेक्षा, होणाऱ्या फायदयाची लेखी नोंद करणे महत्त्वाचे आहे. एकलस्त्रोत खरेदीच्या बाबतीत खरेदी कार्यालय अशा एकल संभाव्य निविदाकाराकडे प्रस्तावाची मागणी करेल आणि निविदाकराबरोबर सदहेतूने वाटाघाटी करेल. त्यानुसार, खरेदी करावयाची वस्तू एकल स्त्रोताकडून खरेदी करणे आवश्यक असल्याचे खरेदीदार विभाग प्रमुखाने विहीत नमुन्यात प्रमाणित करावे. अशा एकल स्त्रोताकडून करावयाच्या खरेदीस संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिव/प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव यांची मंजुरी आवश्यक राहील अशी तरतूद आहे.

**१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस व बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम मुंबई यांच्या बसेसवरील जाहिरातीबाबत :-**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामार्फत बसवरील जाहिरातीकरीता मे. राकेश ॲडव्हर्टायझिंग प्रा.लि. न्यु लिंक रोड, अंधेरी (प.) या संस्थेची दि.०१.०७.२०१६ ते ३०.०६.२०१९ या कालावधीकरीता सोल लायसन्ससी (SOLE LICENSEE) स्वरूपात नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (BEST) मुंबई यांनी मे. राकेश ॲडव्हर्टायझिंग प्रा.लि.मुंबई यांना बेस्ट बसेसवरील जाहिरातीसाठी दि.०१.०८.२०१५ पासून ०३ वर्षाकरीता सोल लायसन्ससी (SOLE LICENSEE) स्वरूपात नियुक्ती करण्यात आलेली आहे .

महाराष्ट्र शासन माहिती व जन संपर्क महासंचालनालय मुंबई यांचे पत्र क्र. संचालक (माहिती) (प्रशासन)/२०१७/१७८ दि.०५.०७.२०१७ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या वतीने एस.टी. बसेस आणि बेस्ट बसेस पॅनलवरील जाहिरातीकरीता खालील तक्त्यात नमूद केलेले दर मंजूर करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | बाब | महासंचालनालयामार्फत देण्यात येणाऱ्या जाहिरातीसाठी सवलतींचा दर (कर वगळून) |
|---|---|---|
| १. | एस.टी. बसेसवरील १ साईड पॅनल | ५,५२५/- |
| | छपाई व लावणे खर्च | १,०५०/- |

| | | |
|---|---|---|
| २. | एस.टी. बसेसवरील बॅक पॅनल | ५,२००/- |
| | छपाई व लावणे खर्च | ७५०/- |
| ३. | बेस्ट बसेस डाव्या बाजूचे साईड पॅनल | ६,५००/- |
| | छपाई व लावणे खर्च | १,२००/- |
| ४. | बेस्ट बसेसवरील उजव्या बाजूचे साईड पॅनल | ७,१५०/- |
| | छपाई व लावणे खर्च | १,२००/- |
| ५. | बेस्ट बसेसवरील बॅक पॅनल | ७,८००/- |
| | छपाई व लावणे खर्च | ६००/- |

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य् विभाग शासन निर्णय दि.१४.०८.२०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसवर जाहिराती करीता मे. राकेश अॅडव्हर्टायझिंग प्रा.लि. मुंबई यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकावर संगणकीय उदघोषणा यंत्रणा (Audio) जाहिरातीचे प्रसारणाबाबत :-**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी मे. व्रित्ती सोल्युशन्स लि. कर्वे रोड, कोथरूड पुणे यांना महाराष्ट्रतील जिल्हा व तालुकास्तरीय, धार्मिक व पर्यटन स्थळे असलेल्या महत्वाच्या बसस्थानकावर संगणकीय उदघोषणा यंत्रणा चालविण्याचे व सदर उदघोषणेदरम्यान व्यवसायिक ऑडियो जाहिराती (जिंगल्स/ संदेश) वेगवेळया शासकीय विभागामार्फत स्विकारणे, प्रसारित करणे, त्यांच्या आयोजनानंतर संबंधित विभागाकडून असलेली देयके स्विकारणे याबाबत एकाधिकार देऊन प्राधिकृत केलेले आहे. सदर संस्थेने राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध विभागाच्या ऑडियो जाहिरातीचे प्रसारण केले असल्याचे त्यांच्या दि.१४.११.२०१७ च्या प्रस्तावात नमूद आहे.

केंद्र शासनाच्या माहिती व प्रसारण विभागांतर्गत Directorte of Advertising and Visual Publicity यांच्या दि.२९.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील ३४ जिल्हयातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ८० बस स्थानकाकरीता प्रति स्थानक प्रति १० सेकंद रू.२०/- प्रमाणे दर मंजूर करण्यात आलेले आहेत.

मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजना व बांधकाम कामगारांच्या नोंदणीत वाढ करण्यासाठी करावयाच्या प्रसार व प्रसिध्दीकरीता खालीलप्रमाणे प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहे.

अ) मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजना व बांधकाम कामगारांच्या नोंदणीत वाढ करण्यासाठी करावयाच्या प्रसार व प्रसिध्दीचा रू. २५.०६ कोटीचा दि.१६.१२.२०१७ रोजी शासनास सादर केलेला वार्षिक आराखडा मंडळाच्या मान्यतेस सादर.

ब) प्रस्तावित वार्षिक आराखडयातील विविध बाबींपैकी सोल लायसन्ससी (SOLE LICENSEE) असलेल्या खालील संस्थेमार्फत जाहिरात करण्यास शासन मान्यतेने आदेश देणेबाबत मंडळाच्या मान्यतेस सादर.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | जाहिरातीचा प्रकार | मंजूर दर | जाहिरातीवरील प्रस्तावित खर्च रू. कोटी |
|---|---|---|---|---|
| १. | मे. राकेश ॲडव्हर्टायझिंग प्रा.लि. मुंबई | एस टी बसेसवरील जाहिरात | महाराष्ट्र शासन माहिती व जन संपर्क महासंचालनालय मुंबई यांचे पत्र क्र. संचालक (माहिती) (प्रशासन)/ २०१७/१७८ दि.०५.०७.२०१७ | ३.०० |
| २. | मे. राकेश ॲडव्हर्टायझिंग प्रा.लि. मुंबई | बेस्ट बसेस वरील जाहिरात | महाराष्ट्र शासन माहिती व जन संपर्क महासंचालनालय मुंबई यांचे पत्र क्र. संचालक (माहिती) (प्रशासन)/२०१७/१७८ दि.०५.०७.२०१७ | ३.५० |
| ३. | मे. व्रित्ती सोल्युशन्स लि. कर्वे रोड, कोथरूड पुणे | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस | केंद्र शासनाच्या माहिती व प्रसारण विभागांतर्गत Directorte of Advertising and Visual | २.५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | स्थानकावरील ऑडियो जाहिराती | Publicity यांच्या दि.२९.०७.२०१७ | |

मंडळाच्या मान्यतेनंतर शासन मान्यता प्राप्त करून पुढील कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.

यावर मा. संचालक लेखा व कोषागारे यांनी बस स्टँड वर जाहिरातींचा फारसा प्रभाव पडत नाही. त्यामुळे यावर किती खर्च करावा याबाबत विचारविनिमय करण्यात यावा, असे मत व्यक्त केले.त्यास मा. कामगार प्रतिनिधी श्री. कुटासकर यांनी असहमती दर्शवून जास्तीत जास्त कामगारांना वाचता येत नाही त्यामुळे ऑडिओद्वारे होणारी प्रसिद्धी जास्त फायदेशीर होईल असेही मत व्यक्त केले. यावर मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी सर्व माध्यमांद्वारे जाहिरात करण्यात यावी असे मत व्यक्त केले. त्यास मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी सहमती दर्शविली.

याबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजना व बांधकाम कामगारांच्या नोंदणीत वाढ करण्यासाठी करावयाच्या प्रसार व प्रसिध्दीचा रू. २५.०६ कोटीचा मंडळाने दि.१६.१२.२०१७ रोजी शासनास सादर केलेला वार्षिक आराखड्यास मान्यता देण्यता येत आहे. प्रस्तावित वार्षिक आराखड्यातील विविध बाबींपैकी सोल लायन्ससी असेलल्या मे. राकेश ॲडव्हटायझींग प्रा. लि. मुंबई यांचेकडॅन एस.टी बसेस वरील व बेस्ट बसेस वरील जाहिराती, में. व्रित्ती सोल्यूशन लि. कर्वे रोड, कोथरूड, पुणे यांचेकडून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस स्थानकावरील ऑडीओ जाहिराती व सामान्य प्रशासन विभागाच्या १४.०७.२०१६ रोजीच्या शासन निणयार्मध्ये नमुद पॅनलवरील संस्थांचे तांत्रिक सादरीकरण, प्रत्यक्षात काम करण्याची क्षमता, कालाकार संच, स्टोरी, थिम, पुर्वानुभव विचारात घेवून किमान दर सादर करणाऱ्या संस्थेमार्फत मंडळाच्या योजनांची माहिती फिरत्या वाहनाद्वारे (मल्टीमिडिया मोबाईल व्हॅन) प्रसार व प्रसिद्धी करण्यात यावी. सदर प्रसार व प्रसिद्धीचे स्वतंत्र प्रस्ताव शासन मान्यसतेस सादर करण्यात यावे, शासन मान्सतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. सदर सोल लायन्ससी शिवाय वार्षिक आराखडयातील अन्य**

माध्यमाद्वारे प्रसार व प्रसिद्धीचा प्रस्ताव शासनाच्या निर्देशानुसार कामगार विभागामार्फत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास सादर करून त्यानुसार प्रसार व प्रसिद्धची कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. ४: मंडळाकडील नोंदित जिवित बांधकाम कामगारांकरीता प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत "महाकामगार आवास योजना" राबविणेबाबत**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.२९.०८.२०१७ रोजीच्या पत्रासोबत गृहनिर्माण विभागाची टिप्पणी प्राप्त झाली होती. सदर टिप्पणीनुसार राज्यातील इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाकामगार आवास योजना राबविण्याचे प्रस्तावित केले आहे. सदरहू प्रस्तावाच्या अनुषंगाने गृहनिर्माण विभागाने मंडळातील बांधकाम कामगारांकरीता सदर योजनेंतर्गत घरकुलाची निर्मिती करण्यासाठी व्याज अनुदान वगळता खर्चाचा ८०% भार मंडळ उचलणार असून २०% कर्जाची प्रतिपूर्ती लाभार्थ्यांकडून करण्यात येणार असून सदर मुद्याच्या अनुषंगाने मान्यता/ अभिप्राय देण्याची विनंती कामगार विभागास केली होती. त्यानुसार सदर योजनेचा प्रस्ताव मंडळाच्या दि.२२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला होता.

मंडळाच्या बैठकीत चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव:** गृहनिर्माण विभागामार्फत प्रस्तावित इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत "महाकामगारआवास योजना" ऐवजी मंडळाने नोंदित बांधकाम कामगारांच्या घराकरीता मंजूर केलेल्या विविध ठरावानुसार सादर केलेल्या प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त करावी. तसेच मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या ठरावात बदल करून प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र नोंदित बांधकाम कामगारांकरीता केंद्रशासन व राज्य शासनाकडून अनुज्ञेय अनुदान रु. २.५ लक्ष शिवाय मंडळाकडून रु.२ लक्ष अनुदान देण्यात यावे. तसा सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

मंडळाच्या उपरोक्त ठरावानुसार गृहनिर्माण विभागाच्या प्रस्तावित महाकामगार आवास योजनेच्या अंमलबाजवणीबाबत मंडळाने असहमती दर्शविली त्याबाबतचे अभिप्राय मंडळाच्या दि..२७.१०.२०१७ रोजी शासनास सादर करण्यात आले होते.

मा. अप्पर मुख्य सचिव गृहनिर्माण विभाग यांच्या दालनात दि.१९.१२.२०१७ रोजी मा. प्रधान सचिव (कामगार) व सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या उपस्थितीत संपन्न बैठकीत महाकामगार आवास योजनेचे स्वरूप बदलून मंडळाने दि.२२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत पारित केलेल्या ठरावानुसार महाकामगार आवास योजनेत पात्र ठरणाऱ्या नोंदीत बांधकाम कामगारांकरीता केंद्र शासनाकडून रू.१/१.५ लक्ष, राज्य शासन रू.१ लक्ष व मंडळाकडून रू. २ लक्ष एवढे

अर्थसहाय्य मंजूर करण्याच्या प्रस्तावास अनुसरून सुधारित योजना तयार करण्यात आलेली आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे

शासन निर्णय गृहनिर्माण विभाग दि.०९.१२.२०१५ अन्वये सदर योजना नागरी समूहांत खालील ०४ घटकांतर्गत राबविण्यात येते.

१. जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करून त्यावरील झोपडपटटयांचा आहे तेथेच पुनर्विकास करणे. (ISSR)
२. कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे (CLSS)
३. खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे (AHP)
४. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लाभार्थ्याद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यासाठी अनुदान (BLC)

उपरोक्त घटक क्र.०१ साठी केंद्र व राज्य सरकारचे अनुदान प्रती लाभार्थी रू.१.०० लक्ष इतके असून घटक क्र.०३ व ०४ साठी केंद्र सरकारचे अनुदान प्रती लाभार्थी रू.१.५० लक्ष इतके तर राज्य शासनाचे अनुदान घटक क्र.०१,०३ व ०४ करीता प्रती लाभार्थी रू.१.०० लक्ष इतके आहे. निरनिराळया घटकांतर्गत कर्ज संलग्न अनुदान वगळता केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाचा हिस्सा ४० टक्के, ४० टक्के आणि २० टक्के अशा ०३ हप्त्यात मुक्त करण्यात येणार आहे. तर घटक क्र.०२ साठी विवक्षित बँका/ गृहनिर्माण वित्तीय कंपन्या व इतर संस्था त्यांच्याकडून १५ वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. रू.६.०० लक्ष वरील कर्ज अनुदान विरहीत असते.

प्रधानमंत्री आवास योजना ही राज्यामध्ये प्रभावीपणे राबविता यावी यासाठी राज्य शासनाकडून विविध सवलती देण्यात आलेल्या आहेत.

१. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व अल्प उत्पन्न् गटातील लाभार्थ्यांसाठीच्या मंजूर गृहनिर्माण प्रकल्पांसाठी अंमलबजावणी यंत्रणा (म्हाडा, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर शासकीय व निमशासकीय संस्था) यांना आवश्यक असलेली आणि निर्बाध्यरित्या वाटपासाठी उपलब्ध असलेली शासकीय जमीन संबंधित जिल्हाधिकारी यांनी रू.१/- प्रती चौ.मी. या नाममात्र दराने कब्जेहक्काची किंमत वसूल करून संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेस भोगवटादार वर्ग-२ या धारणापत्रिकेवर संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्रदान/ हस्तांतरीत करावयाची आहे.

२. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घटक क्र.०१,०३ व ०४ खालील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता बांधण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पास मोजणी शुल्कामध्ये ५० % इतकी सवलत देण्याबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांनी दि.०३.०८.२०१६ रोजी आदेश निर्गमित केले आहेत.
३. योजनेंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तींना/ लाभार्थींना वाटप करण्यात येणाऱ्या ३० चौ.मी. क्षेत्राच्या सदनिकेसाठी केवळ पहिल्या दस्ताला मुद्रांक शुल्कातून सवलत देण्यात आली असून रू.१०००/- इतके मुद्रांक शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

**महाकामगार आवास योजना**

बांधकाम क्षेत्र हे देशातील जनतेला मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देणारे क्षेत्र आहे. तथापि, या क्षेत्रातील कामगार हे विखुरलेले व असंघटीत आहेत. तसेच सदर कामगारांना राहण्यासाठी तसेच अन्य पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध आहेत. तसेच सदर कामगारांना राहण्यसाठी तसेच अन्य पायभूत सोयीसुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे अशा कामगारांना पाणी, रस्ते, वीज, शौचालये व मलनिस्सारण इ. पायाभूत सुविधा असलेली २५ ते ३० चौ.मी. चटई क्षेत्रफळाची घरकुले बांधून देण्याचे प्रस्तुत योजनेत प्रस्तावित आहे.

**योजनेच स्वरूप :-**

१. दहापेक्षा अधिक कामगार कार्यरत असलेल्या इमारत व इतर बांधकाम विकासकास त्याच्या प्रकल्पातील सर्व पात्र व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणीकृत कामगारांना प्रस्तुत योजनेंतर्गत घरे बांधून देणे बंधनकारक असेल.
२. यासाठी एकापेक्षा अधिक विकासक एकत्र येवून सदरची योजना राबवू शकतील.
३. प्रधानमंत्री आवास योजनेतील ०४ घटकाच्या (Components) माध्यमातून ही घरकुले बांधण्यात/ निर्माण करण्यात येतील.
४. म्हाडा, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ आणि संबंधित विकासक यांच्यात होणाऱ्या संयुक्त भागीदारीद्वारे ही घरकुले पूर्ण करण्यात येतील.
५. योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना केंद्र सरकार, राज्य शासन व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून अनुक्रमे रू. १/१.५ लक्ष, रू.१ लक्ष व रू.२ लक्ष इतके अनुदान देण्यात येईल.

## योजनेची वैशिष्टये

१. प्रकल्पासाठी विकासक जमीन उपलब्ध करून देईल.
२. प्रकल्पाचे डिझाईन, बांधकाम, आर्थिक पाठबळ, पूर्वनिश्चित सर्व सुविधा उपलब्ध् करून देणे तसेच पूर्वनिश्चित किंमतीनुसार प्रकल्प विहीत मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी विकासकाची असेल.
३. प्रकल्पाकरीता मुलभूत सुविधा जसे की पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, रस्ते, वीज आदीबाबतची व्यवस्था विकासकांकडून करण्यात येईल.
४. प्रकल्पाचा कालावधी, बांधकामाचे टप्पे, प्रकल्प विहीत मुदतीत पूर्ण करणे व इतर अटी-शर्ती संयुक्त भागीदारी प्रकल्पाच्या करारनाम्यात नमूद असतील.
५. सदर घरकुलांचे अभिहस्तांतरण हे महारेरा अधिनियम, २०१६ नुसार असेल.
६. योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरकुलांतील संरचानात्मक दोष निवारणच्या दायित्वाचा कालावधी हा २० वर्षाचा तर मूलभूत सुविधा जसे की, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, रस्ते, वीज इ. बाबींसाठी दोष निवारणाच्या दायित्वाचा कालावधी हा ०५ वर्षाचा राहील.
७. प्रभारी अभियंता/ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार/ त्रयस्थ तपासणी यंत्रणेच्या माध्यमातून सदर प्रकल्पाचे संनियत्रण म्हाडा करील.
८. विकासक आणि म्हाडा यामध्ये समन्वयासाठी म्हाडा चे कार्यकारी अभियंत केंद्रस्थ् अधिकारी अधिकारी (Nodal officer) म्हणून कार्यरत राहतील. त्यांना वेळोवेळी प्रकल्प तपासणीचे तसेच प्रकल्पाची गती व गुणवत्तेबाबत योग्य तो निर्णय घेण्याचा अधिकार राहील.
९. प्रकल्पाची गुणवत्ता ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमपुस्तिकेतील तरतूदीनुसार राहील.
१०. प्रकल्पाची भौतिक प्रगती आणि गुणवत्ता ही BIS, NBC व DCR च्या मानकांनुसार राहील, याबाबतचे संनियंत्रण मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य स्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती करेल.
११. योजनेंतर्गत गृहप्रकल्पांना स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांचे कायदे/ नियम, विकास नियंत्रण नियमावील (DCR), विकास योजना (DP) व स्थावर मालमत्ता नियमन अधिनियम (RERA) मधील तरतूदी लागू राहतील.

**लाभार्थ्यांची निवड**

ज्या कामगाराचे संपूर्ण देशात कोठेही पक्के घर नाही, त्याच्या कुटूंबाचे एकत्रित उत्पन्न रू.०३ लाखापेक्षा अधिक नाही व सदरचा कामगार हा महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणीकृत आहे अशा कामगारांना प्रस्तुत योजनेचा लाभ घेता येईल. सदर योजनेस केंद्र सरकारने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या महाकामगार आवास योजनेकरीता जमिनीची उपलब्धता, जमिनीचा वैधानिक दर्जा इ. बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. तसेच या योजनेत बांधण्यात येणारी घरकुले ही प्रामुख्याने आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी असल्याने अशा घरकुलांच्या प्रकल्पांना मोजणी शुल्क तसेच मुद्रांक शुल्कातून सूट देण्याची विनंती महसूल विभागास करण्यात आलेली आहे.

याशिवाय या योजनेतील प्रकल्पांना विकास शुल्कातून सूट देण्याबाबत तसेच म्हाडा ला अनुज्ञेय असलेला २.५ इतका चटई क्षेत्रफळ निर्देशांक (FSI) अनुज्ञेय करण्याची विनंती नगरविकास विभागास करण्यात आलेली आहे.

गृहनिर्माण विभागाकडून महाकामगार आवास योजनेचे स्वरूप बदलून उपरोक्त प्रमाणे सुधारित योजना मंजूरीचे प्रस्तावित आहे. मंडळाने दि.२२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत पारित ठरावानुसार नोंदीत बांधकाम कामगारांकरीता महाकामगार आवास योजनेंतर्गत मंडळामार्फत दयावयाचे प्रति लाभार्थी अर्थसहाय्य रू.२.०० लक्ष कायम ठेवून सदर योजनेच्या अटी व शर्ती बाबत गृहनिर्माण विभागाने केलेला प्रस्तावित बदल मंडळाच्या मान्यतेस्तव सादर.

त्यावर मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महादेय (कामगार) यांनी शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातील कामगारांसाठी घरे उपलब्ध करून देण्याबाबात विचार विनिमय करण्यात यावा असे सुचित केले.

त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाकडील नोंदित जिवित बांधकाम कामगारांकरीता प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत "महाकामगार आवास योजना" राबविणेबाबत दिंनाक २२.०९.२०१७ रोजीच्या ठरावात बदल करण्यात यावा.गृहनिर्माण विभागाककडून नोंदित बांधकाम कामगारांकरीता सुधारित महाकामगार आवास योजनेत पात्र ठरणाऱ्या नोंदित बांधकाम कामगारांना मंडळाने यापुर्वीच मंजूर केलेल्या दिंनाक २२.०९.२०१७ ठरावानुसार केंद्र**

शासन व राज्य शासनाकडील अनुदानाशिवाय रु. २ लक्ष एवढे अनुदान देण्यात यावे. केंद्र व राज्य शासनाकडून निर्धारित टप्प्यानुसार मंडळाकडील अनुदान वितरीत करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार |
| कल्याणकारी मंडळ, मुंबई | कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र. ५: मंडळाकडे नोंदित नसलेल्या (अनोंदित) बांधकाम कामगाराचा कामवर असताना मृत्यु झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास खालीलप्रमाणे अर्थसहाय्य दिले जाते.

१. नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या नामनिर्देशित केलेल्या वारसास रु. १०,०००/- (रू.दहा हजार फक्त) एवढी रक्कम अंत्यविधीसाठी मदत.

२. नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्री कामगाराचे विधुर पतीस प्रतीवर्षी रु. २४,०००/- (रू.चोवीस हजार फक्त) एवढे आर्थिक सहाय्य. (फक्त पाच वर्षासाठी)

३. नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यु झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु. ५,००,०००/- (रू.पाच लाख रूपये फक्त) एवढे आर्थिक सहाय्य.

४.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास रू.२ लाख आर्थिक सहाय्य देणेबाबत.

५.नोंदित लाभार्थी कामगारास ७५% किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास रु. २,००,०००/-(रु. दोन लाख रूपये फक्त) एवढे आर्थिक सहाय्य. तथापि, नोंदीत बांधकाम कामगाराचे विमा संरक्षण असल्यास, विमा रक्कमेची प्रतिपूर्ती अथवा मंडळामार्फत रू.२,००,००० आर्थिक सहाय्य यापैकी कोणताही एक लाभ अनुज्ञेय राहील.

उक्त नमूद योजनेंतर्गत लाभ हे फक्त मंडळातील नोंदीत बांधकाम कामगाराच्या कायदेशीर वारसास दिले जातात.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम १२ (१) अन्वये बांधकाम कामगारांची मंडळात नोंदणी केली जाते. तसेच, ज्या बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळात केली जाते त्याच बांधकाम कामगारांना मंडळाच्या योजनांचे लाभ अदा करणेबाबत तरतूद आहे.

अनोंदीत बांधकाम कामगाराचा बांधकामाच्या ठिकाणी मृत्यू झाल्यास दयावयाच्या अर्थसहाय्याबाबत अन्य राज्याकडून माहिती प्राप्त केली असता मध्य प्रदेश या राज्यामध्ये खालीलप्रमाणे लाभ दिले जात आहे अशी माहिती प्राप्त झाली.

| अ.क्र. | योजनेचे नाव | लाभाची रक्कम |
|---|---|---|
| १. | अनोंदीत बांधकाम कामगारांचा मृत्यू झाल्यास अंत्यविधी करीता | रू.३०००/- |
| २. | नैसर्गिक मृत्यू झाल्यास | |
| | i)कामगाराचे वय वर्षे ४५ किंवा त्यापेक्षा कमी असल्यास | रू.७५,०००/- |
| | ii)कामगाराचे वय वर्षे ४५ किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | रू.२५,०००/- |
| ३. | अनोंदीत कामगाराचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास लाभ दिला जातो. | रू.१,००,०००/- |
| ४. | अनोंदीत कामगाराचा अपघातात कायमचे अंपगत्व आल्यास लाभ दिला जातो. | रू.७५,०००/- |

अनोंदीत बांधकाम कामगारास मध्य प्रदेश राज्यात राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यात खालीलप्रमाणे योजना राबविणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. बांधकामाच्या ठिकाणी कामगारांचा कामाच्या ठिकाणी मृत्यू होत असल्याचे निदर्शनास येत आहे. परंतु, मंडळाच्या अधिनियमानुसार जे बांधकाम कामगार मंडळात नोंदीत आहेत अशाच कामगारांना मंडळाच्या योजनांचे लाभ देय आहे. त्या अनुषंगाने ज्या बांधकाम कामगारांनी मंडळात नोंदणी केलेली नाही अशा अनोंदीत बांधकाम कामगाराचा बांधकामाच्या ठिकाणी मृत्यू झाला तर अशा अनोंदीत बांधकाम कामगारांच्या कायदेशीर वारसास अर्थसहाय्य देण्याबाबत खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**योजनेच्या अटी शर्ती :-**

अ. अनोंदीत बांधकाम कामगाराचा बांधकामाच्या ठिकाणी अपघाती मृत्यू अथवा अंपगत्व आल्यास व सदर बांधकाम कामगार संबंधित बांधकामाच्या ठिकाणी ९० दिवसापेक्षा जास्त

दिवस काम करीत असल्याचा ठोस पुरावा उदा. हजेरीपत्रक, बांधकाम कामगारांना अदा करण्यात आलेला वेतनाचा तपशील प्राप्त झाल्यास सदर बांधकाम कामगार नोंदीत आहे असे समजून मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगाराप्रमाणे सर्व लाभ देय राहतील.

**ब.** अनोंदीत बांधकाम कामगाराचा कामाच्या ठिकाणी अपघाती मृत्यू अथवा अंपगत्व आल्यास व सदर बांधकाम कामगार संबंधित बांधकामाच्या ठिकाणी ९० दिवसापेक्षा कमी दिवस काम करीत असल्याचा ठोस पुरावा उदा. हजेरीपत्रक, बांधकाम कामगारांना अदा करण्यात आलेला वेतनाचा तपशील प्राप्त झाल्यास सदर बांधकाम कामगार अनोंदीत समजून मध्यप्रदेशच्या धर्तीवर खालीलप्रमाणे लाभ देणे प्रस्तावित आहे.

**प्रस्तावित अर्थसहाय्य**

| अ.क्र. | योजनेचे नाव | लाभाची रक्कम रू. |
|---|---|---|
| १. | अनोंदीत बांधकाम कामगारांचा मृत्यू झाल्यास अंत्यविधी करीता अर्थसहाय्य | १०,०००/- |
| २. | अनोंदीत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास अर्थसहाय्य | १,००,०००/- |
| ३. | अनोंदीत कामगाराचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास अर्थसहाय्य | २,५०,०००/- |
| ४. | अनोंदीत कामगाराचा अपघातात कायमचे अंपगत्व आल्यास अर्थसहाय्य | ५०,०००/- |

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम ११ नुसार बांधकाम कामगारानांच कल्याणकारी योजनांचा लाभ द्यावयाचा आहे. अनोंदीत बांधकाम कामगारांना प्रस्तावित लाभ दयावयाचा असल्यास अधिनियमातील उपरोक्त तरतूदीस अनुसरून विशेष बाब स्वरूपात शासन मान्यता प्राप्त करून योजना राबविणेबाबत कार्यवाहीस मंडळाच्या मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

यावर मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी कोणत्याही बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास सर्व लाभ देण्यात यावे असे सुचित केले.

मा. प्रधान सचिव यांनी कोणत्याही बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यु झाल्यास त्याला मिळणारे लाभ हे टप्या टप्याने न देता एकदाच प्रतिपुर्ती रक्कम द्यावी असे मत व्यक्त केले.त्यावर मा. मालक प्रतिनधी श्रीमती वेदा आगटे यांनी सदर कामगाराचा वारस पाच वर्षापर्यंत स्टेबल होवून शकतो त्यामूळे त्याला त्या योजनेचा लाभ दरमहा देण्यात येतो असे स्पष्ट केले. तसेच सदर कामगाराच्या वारसाने एकदा अर्ज केल्यास लाभार्थीच्या बँक खात्यात दरमहा रक्कम जमा करण्यात येते असेही स्पष्ट केले. त्यामूळे नोंदित नसलेल्या बांधकाम कामगाराच्या कायदेशीर वारसास एकदाच रक्कम देण्यात यावी व नोंदित बांधकाम कामगाराच्या कायदेशीर वारसास लागू असणाऱ्या योजनांचे लाभ अनोंदित बांधकाम कामगाराच्या वारसास देण्यात यावे असे मत व्यक्त केले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी अनोंदित बांधकाम कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु. ५ लाख व अनोंदित बांधकाम कामगारास कामावर असताना अपघतात कायमचे अपंगत्व आल्यास रु. २ लक्ष अनुदान देण्यात यावे, असे सुचित केले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाकडे नोंदित नसलेल्या (अनोंदित) बांधकाम कामगाराचा कामवर असताना मृत्यु झाल्यास व सदर कामगार कामाच्या ठीकाणी ९० दिवसापेक्षा जास्त् दिवस काम करीत असल्याचा ठोस पूरावा उपलब्ध झाल्यास सदर कामगार मंडळाकडे नोंदणीकृत होता, असे समजून मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांचा कामाच्या ठीकाणी मृत्यू झाल्यास देय असलेले सर्व लाभ देण्यात यावे. सदर अनोंदित बांधकाम कामगार ९० दिवसापेक्षा कमी दिवस काम करत असल्याचा ठोस पुरावा प्राप्त झाल्यास सदर कामगारांना अनोंदित बांधकाम कामगार समजून त्याच्या कायदेशीर वारसास रु. ५ लाख व कामावर असताना अपघातात ७५% पेक्षा जास्त अपंगत्व आल्यास व तसा सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचा दाखला प्राप्त झाल्यास रु. २ लक्ष अनुदान सदर**

कामगारास देण्यात यावे. सदर योजनेमध्ये बांधकाम कामगाराच्या कायदेशीर वारसाने संबंधित जिल्हा कार्यालयात अर्ज सादर केल्यानंतर त्याची छाननी करून सदर कार्यालयाने प्रस्ताव मंडळाकडे सादर करावा. मंडळाने सदर प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. ६: नोंदित बांधकाम कामगारांकरीता मोबाईल टॉयलेट (Mobile Toilet) ची सुविधा उपलब्ध करून देणे.**

याबाबत मंडळ सचिव असे सादर केले की, केंद्र शासनाच्या श्रम एवं रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांचेमार्फत दि.११ जुलै २०१७ रोजी लेबर कम नाईट शेल्टर, मोबाईल टॉयलेट, मोबाईल क्रेंच इ. सुविधा बांधकाम कामगारांना उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत. सदर पत्राची प्रत दि.२२.०९.२०१७ रोजीच्या मंडळ बैठकीत माहितीस्तव सादर करण्यात आली होती.

बांधकाम कामगार कामानिमित्त सतत स्थलांतरीत होत असतात. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत झाल्यांनतर प्रत्यक्ष काम मिळेपर्यंत सदर बांधकाम कामगारांना राहणे, शौचालय,पाळणाघर इत्यादी अभावी मुलभूत सोयी सुविधेकरीता त्रास सहन करावा लागतो. बांधकाम कामगारांना लेबर कम नाईट शेल्टर, मोबाईल टॉयलेट, मोबाईल क्रेंच अशा सोयी सुविधा मंडळामार्फत उपलब्ध करून देणेबाबत केंद्र शासनाचे निर्देश प्राप्त झाले आहे.

केंद्र शासनाने त्यांच्या दि.०८.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार बांधकाम कामगारांना सामाजिक सुरक्षे संबधीत योजनांचा लाभ दिल्यानंतर उपलब्ध निधीमधून उपरोक्त सोयी सुविधावर खर्च करण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे.

सदर ट्रांझिट अकोमडेशन, लेबर कम नाईट शेल्टर, मोबाईल टॉयलेट, मोबाईल क्रेंच इत्यादी सुविधा उपलब्ध करून देताना खालील अटींचे पालन करणे बाबत केंद्र शासनाने सूचीत केले आहे.

१. शासन अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जागेवर सदर सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.
२. सदर सुविधा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असावी.
३. सदर सुविधा प्रथम महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात देण्यात याव्यात.
४. सदर सुविधांचा वापर फक्त बांधकाम कामागरांकरीताच करण्यात यावा.
५. सदर सुविधेचा वापर शुल्क आकारून / निशुल्क पध्दतीने करताना त्याबाबतची नोंद रजिस्टरमध्ये ठेवण्यात यावी.
६. ट्रांझिट अकोमडेशन, लेबर कम नाईट शेल्टर करीता उभारण्यात आलेले इमारतीमध्ये सर्व सोयी सुविधांचा समावेश असावा.

७. मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांना विविध योजनांचा लाभ वाटपाकरीता होणाऱ्या वार्षिक खर्चाच्या तुलनेत १० % पेक्षा जास्त खर्च अशा सुविधांवर करण्यात येऊ नये.

८. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम ३३, ३४, ३५ आणि ३६ अन्वये सदरच्या सुविधा बांधकाम कामगारास कंत्राटदाराने पुरविणे बंधनकारक आहे. त्यामुळे सदर सुविधांचा वापर कंत्राटदाराने द्यावयाच्या सुविधेच्या ऐवजी करण्यात येऊ नये.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम ११ अन्वये उपकर निधीमधून राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ फक्त नोंदीत बांधकाम कामगारानांच देण्याची तरतूद आहे.

**अन्य राज्यातील स्थिती :-**

गुजरात राज्य सरकारने मोबाईल टॉयलेट ऐवजी टॉयलेट कॉम्पलेक्स उभारण्यात आलेले आहे. अन्य राज्यात मोबाईल टॉयलेटची सुविधा अद्याप उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

केंद्र शासनाचे उपरोक्त निर्देश व सदर सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतच्या अटी शर्ती विचारात घेऊन बांधकाम कामगारांना मोबाईल टॉयलेट (Mobile Toilet) सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**योजना राबविण्याचा उददेश :-**

१. बांधकाम कामगारांची सुरक्षा व स्वच्छता ठेवणे.

२. बांधकाम कामगारांना शहरी दर्जाप्रमाणे स्वच्छता गृह उपलब्ध करून देणे.

**मोबाईल टॉयलेटचा प्रस्ताव :-**

१. ज्या बांधकाम साईटवर १०० ते २५० पर्यंत बांधकाम कामगार काम करतात अशा ठिकाणी मोबाईल टॉयलेटची सुविधा उपलब्ध करून देणे .

२. सदर योजना प्रथम टप्प्यात मुंबई, पुणे आणि नागपूर या तीन ठिकाणी प्रायोगिक तत्तवार राबविण्यात येईल.

३. अनुभवी वास्तू शिल्पकराकडून मोबाईल टॉयलेटचे डिझाईन तयार करून घेण्यात येइल.

४. महानगरपालिका/ नगरपालिका किंवा कंत्राटदाराने उपलब्ध करून दिलेल्या जागेवर मोबाईल टॉयलेट ठेवण्यात येईल व आवश्यकतेनुसार अन्य साईटवर स्थलांतरीत करण्यात येईल.

५. पुरूष व स्त्री बांधकाम कामगाराकरीता स्वतंत्र मोबाईल टॉयलेट उपलब्ध करून देण्यात येतील. (०३ युनिट पैकी ०२ युनिट पुरूष व ०१ युनिट स्त्रीयांकरीता राहील)

६. नोंदीत बांधकाम कामगारांकरीता सदर सुविधा निशुल्क असेल. अनोंदीत बांधकाम कामगार किंवा अन्य व्यक्ती कडून टॉयलेटचा वापर होत असल्यास त्याबाबत शुल्क आकारण्यात येईल.

७. मोबाईल टॉयलेटचा दर्शनी भाग मंडळाच्या योजनांच्या जाहिरातीकरीता वापरण्याबाबत विचार करण्यात येईल.

८. सदर मोबाईल टॉयलेटच्या देखभाल, दुरूस्तीकरीता प्रशिक्षित व्यक्तीची नेमणूक करणे पुरवठादारकार बंधनकारक राहील.

९. विद्युत व पाणी पुरवठयाची जबाबदारी पुरवठा दार संस्थेची राहील.

बांधकामाच्या साईटवर नोंदीत बांधकाम कामागरांकरीता मोबाईल टॉयलेटची प्रस्तावित योजना व अटी शर्तीबाबत मंडळ बैठकीत विचारविनिमय करून उचित निर्णयार्थ प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

यावर मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी असे सुचित केले की, टॉयलेट (Mobile Toilet) ची सुविधा उपलब्ध करून देताना प्रथम टप्प्यात फक्त तीन विभागात न करता मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती या सात ठीकाणी प्रायोगिक तत्वावर करण्यात यावी. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: ज्या बांधकामाच्या ठीकाणी ५० ते २५० बांधकाम कामगार काम करतात अशा बांधकामाच्या ठीकाणावरील नोंदित बांधकाम कामगारांकरीता मोबाईल टॉयलेट (Mobile Toilet) ची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. सदर योजना राबवविताना प्रथम टप्प्यात मुंबई, ठाणे, पूणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद व अमरावती या सात ठीकाणी प्रायोगिक तत्वावर राबविण्यात यावी. यथा प्रस्तावित अटी**

शर्तीसह योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, शासन स्तरावरून योजना मंजूरीनंतर योजना राबविण्यासाठी सदर क्षेत्रातील अनुभवी संस्थेची नेमणूक ई-निविदा पद्धतीने करण्यात यावी. ई- निविदा मागविण्यासाठी आवश्यक RFP Document मंडळाचे e-Gov Consultant यांच्याकडून तयार करून घेण्यात यावी. सदर RFP Document ला शासन मान्यता प्राप्त करून ई-निविदा पद्धतीने संस्था निश्चित करण्यात यावी. संस्था निश्चितीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र. ७: नोंदित बांधकाम कामगारांकरीता ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) ची सुविधा उपलब्ध करून देणे**

याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, केंद्र शासनाच्या श्रम एवं रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांचेमार्फत दि.११ जुलै २०१७ रोजी लेबर कम नाईट शेल्टर, मोबाईल टॉयलेट, मोबाईल क्रेंच इ. सुविधा बांधकाम कामगारांना उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत. सदर पत्राची प्रत दि.२२.०९.२०१७ रोजीच्या मंडळ बैठकीत माहितीस्तव सादर करण्यात आली होती.

बांधकाम कामगार कामानिमित्त सतत स्थलांतरीत होत असतात. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत झाल्यांनतर प्रत्यक्ष काम मिळेपर्यंत सदर बांधकाम कामगारांना राहणे, शौचालय,पाळणाघर इत्यादी अभावी मुलभूत सोयी सुविधेकरीता त्रास सहन करावा लागतो. बांधकाम कामगारांना लेबर कम नाईट शेल्टर, मोबाईल टॉयलेट, मोबाईल क्रेंच अशा सोयी सुविधा मंडळामार्फत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाने त्यांच्या दि.०८.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार बांधकाम कामगारांना सामाजिक सुरक्षे संबधीत योजनांचा लाभ दिल्यानंतर उपलब्ध निधीमधून उपरोक्त सोयी सुविधावर खर्च करण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे.

सदर ट्रांझिट अकोमडेशन, लेबर कम नाईट शेल्टर, मोबाईल टॉयलेट, मोबाईल क्रेंच इत्यादी सुविधा उपलब्ध करून देताना खालील अटींचे पालन करणे आवश्यक आहे.

१. शासन अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जागेवर सदर सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.
२. सदर सुविधा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असावी.
३. सदर सुविधा प्रथम महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात देण्यात याव्यात.
४.सदर सुविधांचा वापर फक्त बांधकाम कामागरांकरीताच करण्यात यावा.
५.सदर सुविधेचा वापर शुल्क आकारून / निशुल्क पध्दतीने करताना त्याबाबतची नोंद रजिस्टरमध्ये ठेवण्यात यावी.
६. ट्रांझिट अकोमडेशन, लेबर कम नाईट शेल्टर करीता उभारण्यात आलेले इमारतीमध्ये सर्व सोयी सुविधांचा समावेश असावा.

७.मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांना विविध योजनांचा लाभ वाटपाकरीता होणाऱ्या वार्षिक खर्चाच्या तुलनेत १० % पेक्षा जास्त खर्च अशा सुविधांवर करण्यात येऊ नये.

८.इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम ३३, ३४, ३५ आणि ३६ अन्वये सदरच्या सुविधा बांधकाम कामगारास कंत्राटदाराने पुरविणे बंधनकारक आहे. त्यामुळे सदर सुविधांचा वापर कंत्राटदाराने द्यावयाच्या सुविधेच्या बदलात करण्यात येऊ नये.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम ११ अन्वये उपकर निधीमधून राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ फक्त नोंदीत बांधकाम कामगारानांच देण्याची तरतूद आहे.

**अन्य राज्यातील स्थिती :-**

सद्यस्थितीत ट्रांझिट कॅम्पची सुविधा अन्य कोणत्याही राज्यात उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

केंद्र शासनाचे उपरोक्त निर्देश व सदर सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतच्या अटी शर्ती विचारात घेऊन बांधकाम कामगारांना ट्रांझिट कॅम्पची (Transist Camp) सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**योजना राबविण्याचा उददेश :-**

बांधकाम कामगारांना तात्पुरता सुरक्षित निवारा उपलब्ध करून देणे

**ट्रांझिट कॅम्पचा प्रस्ताव :-**

१. ज्या बांधकाम साईटवर १०० ते २५० पर्यंत बांधकाम कामगार काम करतात अशा ठिकाणी ट्रांझिट कॅम्पची सुविधा उपलब्ध करून देणे .
२. सदर योजना प्रथम टप्प्यात मुंबई, पुणे आणि नागपूर या तीन ठिकाणी प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येईल.
३. सदर योजना महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात राबविण्यापूर्वी सदर क्षेत्रात चालू असलेल्या बांधकाम साईटचे सर्वेक्षण करण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील.

४. सदर सुविधेकरीता शासन/महानगरपालिका/ नगरपालिका/कंत्राटदार यांचेमार्फत जागा उपलब्ध करून देतील. परिसरातील बांधकाम साईटचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर ट्रांझिट कॅम्प स्थलांतरीता करण्यात येतील व ट्रांझिट कॅम्प करीता वापरण्यात आलेली जागा संबंधित संस्थांच्या ताब्यात देण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील.

५. ट्रांझिट कॅम्पची स्थापनेमुळे बांधकामाच्या साईटवर अथवा परिसरातील नागरी सुविधांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेणे नियुक्त संस्थेवर बंधनकारक राहील.

६. ट्रांझिट कॅम्पमध्ये निवास, स्वयंपाकघर, स्वच्छतागृह या मूलभूत सुविधांचा समावेश राहील.

७. उपरोक्त संस्थांकडून जागा उपलब्ध न झाल्यास ठराविक कालावधीसाठी जागा भाडयाने घेण्यात येईल. सदर जागेचे भाडे मंडळाकडून नियुक्त संस्थांना अदा करण्यात येईल.

८. ट्रांझिट कॅम्पची देखभाल, दुरूस्ती, स्वच्छता, पाणीपुरवठा, विद्युत पुरवठा इत्यादीबाबतची जबाबदारी नियुक्त संस्थाची राहील.

९. सदर ट्रांझिट कॅम्पच्या देखभाल, दुरूस्तीकरीता प्रशिक्षित व्यक्तीची नेमणूक करणे नियुक्त संस्थेस बंधनकारक राहील.

बांधकामाच्या साईटवर बांधकाम कामागरांकरीता ट्रांझिट कॅम्पच्या प्रस्तावित योजना व अटी शर्तीबाबत मंडळबैठकीत विचारविनिमय करून उचित निर्णयार्थ प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

यावर मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी असे सुचित केले की, नोंदित बांधकाम कामगारांना ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) ची सुविधा बाहेर राज्यातून किंवा राज्यतील अन्य ठीकाणाहून बांधकामाशी संबंधित कामाकरीता येणाऱ्या कामगारांना उपलब्ध करून देताना प्रथम टप्प्यात फक्त तीन विभागात न करता मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व अमरावती या सात ठीकाणी प्रायोगिक तत्वावर राबविण्यात यावी व त्यासाठी संस्था निश्चित करावी. सदर संस्थेने ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) उभारताना ट्रांझिट कॅम्पमध्ये निवास, स्वयंपाकघर, स्वच्छतागृह या मूलभूत सुविधांसह उभारणी करावी. तसेच त्यामधील कामगारांना प्रवेश देण्यापासून ते कामगारांना काम मिळेपर्यंत अथवा २० दिवस यापैकी जे कमी असूल त्या कालावधीपर्यंत कामगारांना ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) सुविधा उपलब्ध करून द्यावी व सर्व कामगारांची पर्यायी व्यवस्था झाल्यानंतर ट्रांझिट कॅम्प (Transit Camp)करीता वापरण्यात आलेली जागा संबंधित संस्थांना परत करण्याची जबाबदारी ही पुरवठादार संस्थेची राहील. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: अन्य राज्यामधून अथवा राज्यातील अन्य भागामधून बांधकामाशी संबंधित कामाकरीता आलेल्या जिवित नोंदित बांधकाम कामगारांकरीता ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) ची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. सदर योजना प्रथम टप्प्यात मुंबई,ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व अमरावती या सात ठीकाणी प्रायोगिक तत्वावर राबविण्यात यावी. ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) उभारताना त्यामध्ये निवास, स्वयंपाकघर, स्वच्छतागृह या मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्या. ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) मध्ये कामगारांना प्रवेश देण्यापासून ते कामगारांना काम मिळेपर्यंत अथवा २० दिवस यापैकी जे कमी असेल त्या कालावधीपर्यंत कामगारांना ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) सुविधा उपलब्ध करून द्यावी. तसेच कोणताही बांधकाम कामगार निर्धारित मुदतीपेक्षा जास्त् कालावधीपर्यंत ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) मध्ये राहणार नाही याची दक्षता नियुक्त संस्थेची राहील. ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) च्या कराराची मुदत संपल्यानंतर नियुक्त संस्थेने शासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/ खाजगी मालकीची जागा संबंधित मालकांना परत करावी, याबाबतची सर्वस्वी जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील. यथा प्रस्तावित अटी शर्तीसह योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, शासन स्तरावरून योजना मंजूरीनंतर योजना राबविण्यासाठी सदर क्षेत्रातील अनुभवी संस्थेची नेमणूक ई-निविदा पद्धतीने करण्यात यावी. ई- निविदा मागविण्यासाठी आवश्यक RFP Document मंडळाचे e-Gov Consultant यांच्याकडून तयार करून घेण्यात यावी. सदर RFP Document ला शासन मान्यता प्राप्त करून ई-निविदा पद्धतीने संस्था निश्चित करण्यात यावी. संस्था निश्चितीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा. शासन मान्यतेनुसार कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. ८: नोंदित बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजन योजनेच्या सुधारित RFP ला मान्यता देणे**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न् दि.०७.०९.२०१७ रोजीची बैठकीमधील सूचना व शासनाच्या दि.१२.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये ई-निविदेशी संबंधित अटी शर्तीस अनुसरून मे. केपीएमजी यांना सदर योजनेचे RFP डॉक्युमेंटस तयार करण्याबाबत सूचित केलेले होते त्यानुसार त्यांनी RFP डॉक्युमेंटस सादरीकरण मंडळाच्या दि.२२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आले होते.

सदर बैठकीत मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी मध्यान्ह भोजन योजनेबाबतच्या RFP डॉक्युमेंटस सर्व मंडळ सदस्यांना देण्यात यावी व मंडळ सदस्यांनी सदर RFP डॉक्युमेंटस मध्ये काही बदल/ सुचना करावयाचे असल्यास मंडळाला आठ दिवसात कळवावे. त्यानुसार सदर RFP डॉक्युमेंटसचे मध्ये योग्य तो बदल मे. केपीएमजी मार्फत करण्यात यावा, असेही सूचित केले.

त्यानुसार मंडळाच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-** नोंदीत बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना प्रायोगिक तत्वावर मुंबई, एमएमआरडीए क्षेत्रात (लक्षांक- १०,००० प्रतिदिन), पुणे (लक्षांक- १०,००० प्रतिदिन) व नागपूर (लक्षांक- ०५,००० प्रतिदिन) या ठिकाणी राबवावी. या साठी मंडळाचे Consultant मे. केपीएमजी यांनी सादरीकरण केलेल्या RFP डॉक्युमेंटसची प्रत ई-मेल द्वारे सर्व मंडळ सदस्यांना पाठवावी. मंडळ सदस्यांनी सदर RFP डॉक्युमेंटस मध्ये काही बदल करावयाचे असल्यास मंडळाला आठ दिवसात कळवावे. मंडळ सदस्यांनी सुचविलेल्या बदलासह प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

उक्त ठरावाच्या अनुषंगाने सदर योजनेचे RFP डॉक्युमेंटसची हार्ड कॉपी मंडळाच्या सदस्यांना पाठविण्यात आलेली होती. तयानुसार मंडळ सदस्याकडून प्राप्त झालेल्या सुचना, मा. प्रधान सचिव (कामगार) यांच्या दालनात दिनाक ३०.१०.२०१७ रोजी संपन्न बैठकीतील सुचना व दिनाक ०८.११.२०१७ रोजी NABL Approved Agency प्राप्त् झालेल्या स्वयंपाकघर व प्रयोगशाळेकरीता आवश्यक निकष तसेच गूणवत्ता प्रमाणके इत्यादीबाबत चे शिफारशी मे. KPMG यांना कळविण्यात आल्या. त्यास अनुसरून मे. KPMG यांनी तयार

केलेले RFP Document चे सादरीकरण करावे, अशी विनंती करण्यात आली. तद्नंतर e-Gov Consultant मे. KPMG यांच्या प्रजिनिधींनी मध्यान्ह भोजन योजनेच्या सुधारित RFP चे सादरीकरण केले. सादरीकणातील ठळक् मुद्दे खालीलप्रमाणे:

१. नोंदित बांधकाम कामगारांकरीता मध्यान्ह भोजना योजना खालील तीन गटात राबविण्यात येईल.

| अ.क्र. | गट | प्रायोगिक तत्वावर योजना राबविण्याचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | मुंबई, नवी मुंबई आणि औरंगाबाद विभाग | मुंबई |
| २ | नाशिक विभाग, कोकण विभाग (मुंबई व नवी मुंबई वगळून) | ठाणे |
| ३ | पुणे विभाग, अमरावती विभाग, नागपूर विभाग | नागपूर |

२. सदर योजनेअंतर्गत प्रथम टप्प्यात प्रायोगिक तत्वावर तीन ठीकाणी तीन महिन्याच्या कालावधीकरीता प्रत्येक ठिकाणी २० हजार याप्रमाणे एकूण ६० हजार लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

३. तद्नंतर सदर योजना उपरोक्त तीन गटात पुढील तीन वर्षाकरीता राबविण्यात येईल व त्यामध्ये प्रति गट ५० हजार याप्रमाणे एकूण १ लाख ५० हजार लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

४. शासन मान्यतेनुसार योजनेचा कालावधी पुढील ०२ वर्षाकरीता वाढविता येईल.

५. नियुक्त करावयाच्या संस्थेच्या कामाचे संक्षिप्त स्वरुप-

i. ज्या बांधकामाच्या ठीकाणी २५० पेक्षा कमी बांधकाम कामगार काम करतात अशा ठीकाणांचे सर्वेक्षण करावे तसेच सदर आस्थापनांकडून त्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करून सदर ठीकाणांच्या यादीस जिल्हा कार्यालयाकडून मान्यता घेण्यात यावी.

ii. अनोंदित बांधकाम कामगारांची नोंदणी करण्याकरीता मदत करणे/ सहकार्य करणे.

iii. संस्थेकडे NABL Approved Agency ने केलेल्या शिफारशीनुसार स्वयंपाक घर व प्रयोगशाळा असावी.

iv. सदर प्रयोगशाळेत चाचणी केल्यानंतर मंडळाने निश्चित केलेल्या उष्मांक व मेन्यू नुसार दररोज अन्न पदार्थ बनविणे

v. अन्न पदार्थांचा वाहनाद्वारे पुरवठा करणे. सदर वाहनांवर मंडळाची प्रसिद्धी करणे आणि खाद्य पदार्थांचे स्टॉलची/ काऊंटरची उभारणी करून वाटप करणे.

vi. RF Based distribution Card आणि Cloud Based System द्वारे नियंत्रण ठेवण्याकरीता RF Based distribution Card, Cloud Based Monitoring System व मंडळाच्या इतर सिस्टमबरोबर इंटीग्रेशन करणे.

vii. नियुक्त संस्थेने पुरवठा केलेले खाद्यपदार्थाचा दर्जा कमीत कमी ०६ तास खाण्यासाठी योग्य राहील अशा प्रकारचा प्रतिज्ञापत्र देणे.

viii. खाद्यपदार्थ वाटपाचे वेळापत्रक कामगार नाक्याच्या ठिकाणी सकाळी ०८ ते सकाळी १० आणि बांधकामाच्या ठिकाणी दुपारी १२ ते दुपारी ०२ असे असावे.

६. मंडळ सदस्यांनी केलेल्या सुचना, NABL Approve Agency ने केलेल्या शिफारशी व त्यानुसार करण्यात आलेले RFP मधील कामाचे स्वरुप, निविदापुर्व अर्हता तसेच इतर ठिकाणी केलेले बदल सादर करण्यात आले.

७. सदर सादरीकरणादरम्यान मे. KPMG यांनी मंडळाने सदर योजना राबविताना तीन गटांकरीता ई-निविदा पद्धतीने तीन स्वतंत्र निविदा मागविण्यात याव्या किंवा एकच RFP Document प्रसिद्ध कराव्यात अशी शंका उपस्थित केली. त्यावर मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी तीन गटांकरीता ई-निविदा पद्धतीने तीन स्वतंत्र निविदा मागविण्यात याव्यात व एका निविदाकरास तीनही निविदा प्रक्रीयेत सहभागी होता येईल, असे सुचविले. तथापि, सदर संस्थेची एका पेक्षा जास्त निविदेत निवड झाल्यास सदर संस्था एका पेक्षा जास्त गटात काम करण्यास सक्षम आहे का याची तपासणी करून पुढील निर्णय घ्यावा लागेल, असे सुचित केले.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजन योजनेकरीता सादरीकरणानुसार योजनेचे गट, प्रायोगिक तत्वावरील ठीकाणे, प्रस्तावित लक्षांक, सुधारित निविदेच्या कामाचे स्वरुप, अटी, शर्ती व संस्था निश्चितीबाबतच्या अटी शर्तीस मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. सुधारित RFP Document शासन मान्यतेस सादर करून ई-निविदा पद्धतीने संस्था निश्चित करण्यात यावी. संस्था**

निश्चितीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र. ९: मे. KPMG या मंडळाच्या IT Consultant संस्थेच्या नियुक्तीस मुदतवाढ देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, राज्याचे प्रशासन अधिक गतीमान तसेच लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी प्रशासकीय कामकाजाचे संगणकीकरण करण्याचे शासनाचे धोरण आहे. कामगार विभागाचे एकात्मिक कामगार व्यवस्थापन प्रणाली (ILMS) राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आला त्यास अनुसरून माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णय दि.०१.०७.२०१४ नुसार सदर शासन निर्णयातील empanelled संस्थेपैकी ०४ संस्थांना दि.२०.१२.२०१७ रोजी मा. मंत्री महोदय कामगार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न् बैठकीत सादरीकरणासाठी बोलविण्यात आले होते. सदर बैठकीस प्रधान सचिव कामगार, कामगार आयुक्त, संचालक माहिती व तंत्रज्ञान विभाग व संचालक NIC यांनाही बोलविण्यात आले होते. सदर बैठकीत प्रथम टप्प्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध योजनांचे RFP Document तयार करणे, निविदा प्रक्रिया व निविदा प्रक्रियेशी संबंधित कामकाजाकरीता मे. केपीएमजी या सल्लगार संस्थेची नेमणूक करणेबाबत निर्णय घेण्यात आला होता.

मे. केपीएमजी या संस्थेच्या नेमणूकीबाबत मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

"मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्ययंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत तयार करण्यात आलेले RFP Document व ई-निविदा रद्द करण्यात यावी. मंडळामार्फत नियुक्त करण्यात आलेले IT Consultant मे. अर्न्स्ट ॲन्ड यंग एल पी पी यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी. त्याऐवजी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचेकडून सदर कामाचे नव्याने RFP Document तयार करून घेण्यात यावे. नव्याने तयार करण्यात आलेल्या RFP Document मंडळाचे बैठकीसमोर ठेवून त्यावर चर्चा करून त्यास मंडळाची मान्यता घेवून पुन्हा मंडळ स्तरावर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला."

माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०१.०७.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये व मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या मंडळाच्या बैठकीत झालेल्या ठरावानुसार मे. केपीएमजी या आयटी कन्सल्टंट कडून १ सिनियर कन्सल्टंट व १ कन्सल्टंट यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ व दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत खालील विविध योजनांच्या कामाचे RFP डॉक्युमेंटस तयार करण्याबाबत मान्यता देण्यात आली.

१. बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटित कामगार मंडळ यांचे दोन वेगवेगळे सुविधा केंद्र स्थापन करण्याऐवजी एकच सुविधा केंद्र स्थापन करणे, सदर सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी कार्यालयाची स्थापना व एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठी स्वतंत्र संस्थेची नेमणूक करण्याबाबतचे RFP डॉक्युमेंटस तयार करणे.
२. उपकर जमा करण्यासाठी प्रत्येक बांधकामाच्या ठिकाणाचे Mapping करण्याकरीता RFP डॉक्युमेंटस तयार करणे.
३. बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी पाळणाघराची (मोबाईल डे-केअर सिस्टम) सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतची RFP डॉक्युमेंटस तयार करणे.
४. बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणेबाबतच्या योजनेची RFP डॉक्युमेंटस तयार करणे.
५. मंडळास बाहय संस्थेमार्फत मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी संस्था निवडीकरीता RFP डॉक्युमेंटस तयार करणे.

मंडळाच्या उपरोक्त मान्यतेनुसार मे. केपीएमजी यांना RFP डॉक्युमेंटस तयार करण्याबाबत कळविण्यात आले होते.

दि.२३.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मे. केपीएमजी यांनी यांनी अतिरिक्त मनुष्यबळाची मागणी केली होती त्या मागणीस अनुसरून मंडळाच्या बैठकीत शासन निर्णयातील मुदत व वेळोवेळी प्राप्त होणारी मुदतवाढ विचारात घेऊन नेमणूकीचे आदेश देण्यात यावेत, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. त्यानुसार मे. केपीएमजी यांना अतिरिक्त मनुष्यबळ नियुक्त करून पुढील कार्यवाही करण्याबाबत दि.१३.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित करण्यात आलेले आहे.

माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णयाची मुदत दि.३० जून २०१७ पर्यंत आहे. त्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे चौकशी केली असता सदर शासन निर्णयास मुदतवाढ देण्यात येणार नसल्याचे सांगण्यात आले होते. सुधारित ई-निविदा प्रसिध्द करून नवीन पॅनल नियुक्त केले जाणार आहे. सदर कार्यवाहीस ०३ ते ०४ महिन्यांचा कालावधी लागणार होते.

माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णयाची मुदत दि.३० जून २०१७ रोजी संपली असल्याने मंडळाच्या इतर योजनांच्या RFP डॉक्युमेंटस बनविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. याबाबी विचारात घेऊन मे. केपीएमजी यांना शासन माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील

निविदा प्राक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा ०१ जुलै २०१७ पासून पुढील ०६ महिन्यांकरीता मुदत वाढ दि.१८.०७.२०१७ रोजीच्या बैठकीत देण्यात आली होती. त्यानुसार मे. केपीएमजी या संस्थेकडील खालील सल्लागार मंडळाकडे रूजू झालेले आहेत.

| अ.क्र. | सल्लागाराचे नाव | सल्लागाराचे पद | शासन आदेशानुसार दरमहा वेतन (रू. लाखात) | मंडळाकडे रूजु दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. कैलास पाटील | Principle Consultant | २.७५ | जुलै २०१७ |
| २. | श्री. सागर चौधरी | Senior Consultant | २.२० | नोव्हेंबर २०१७ |
| ३. | श्री. चेतन पेडणेकर | Senior Consultant | २.२० | ऑक्टोबर २०१७ |
| ४. | श्री. अनय पिंपळखुटे | Consultant | १.६० | जुलै २०१७ |
| ५. | श्री. अभिनव जोशी | Consultant | १.६० | डिसेंबर २०१७ |
| ६. | श्रीम. मोहिनी भैसारे | Consultant | १.६० | डिसेंबर २०१७ |

माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०९.१०.२०१७ रोजीच्या शासन आदेशान्वये दि.३०.०९.२०१७ पूर्वी नियुक्त केलेल्या सल्लगागार संस्थेस दि.३१.०३.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

मंडळाच्या बैठकीत नवीन योजना राबविणेबाबत वेळोवेळी पारित केलेले ठराव व सदर योजनांना शासन स्तरावरून प्राप्त मान्यतेस अनुसरून करावयाच्या कार्यवाहीकरीता मे. केपीएमजी या सल्लागाराची सेवा यापुढेही आवश्यक असल्याने मे. केपीएमजी या सल्लागार संस्थेच्या नेमणूकीस माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०९.१०.२०१७ च्या शासन आदेशान्वये दि.३१.०३.२०१८ पर्यंत मुदताढ देणेबाबत मंडळाच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

याबाबत मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी मंडळाच्या योजनांचे RFP तयार होईपर्यंत मे. केपीएमजी यांना मुदत वाढ देण्यात यावी असे सुचविले. याबाबत मा.

प्रधान सचिव (कामगार) यांनी दिंनाक ३१ मार्च २०१९ पर्यंत मुदत वाढ देण्यात यावी असे प्रस्तावित केले, त्यास मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी सहमती दर्शविली.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मे. KPMG या मंडळाच्या IT Consultant संस्थेच्या नियुक्तीस दिंनाक ३१ मार्च २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र. १०: मंडळाच्या कार्यालयीन कामकाजाकरीता क्षेत्रिय कार्यालयांना संगणक, प्रिंटर व स्कॅनिंग मशिन उपलब्ध करून देणे व त्यासाठी येणाऱ्या अंदाजित खर्चास मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव असे सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मुख्यालय,विभागीय तसेच प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी बाहय यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना बांधकाम कामगारांची नोंदणी करणे,मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना राबविणे व त्यांना लाभ देणे व इतर अनुषंगिक कार्यालयीन कामकाजासाठी संगणक व प्रिंटर्स उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने, प्रत्येक जिल्हा कार्यालयास २ संगणक व १ मोठे प्रिंटर्स (स्कॅनर, झेरोक्स्, प्रिंट) तसेच प्रत्येक विभागीय कार्यालयास २ संगणक व १ मोठे प्रिंटर्स (स्कॅनर, झेरोक्स्, प्रिंट) व मुंबई येथील मुख्यालयासाठी ५ संगणक व २ मोठे प्रिंटर्स (स्कॅनर, झेरोक्स्, प्रिंट) आणि ३ छोटे (स्कॅनर, झेरोक्स्, प्रिंट) पुरविण्याबाबत ठराव सर्वानुमते मान्य् करण्यात आला.९९ संगणक व ५२ प्रिंटर्स खरेदीचा प्रस्ताव मंडळाच्या दि. २९.०३.२०१६ रोजीच्या पत्राने शासनास सादर करण्यात आला होता.

त्यानुषंगाने, शासनाच्या दि. ३०.०६.२०१६ रोजीच्या पत्राने मंडळाच्या मुख्यालय, विभागीय व जिल्हा कार्यालयांकरीता आवश्यक असलेले ९९ संगणक व ५२ प्रिंटर्स खरेदी करण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

परंतू, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाच्या शासन निर्णय दि.०९.०८.२०१६ नूसार माहीती व तंत्रज्ञान मंडळाची निर्मीती केलेली असून शासनाच्या अधिपत्याखालील सर्व महामंडळानी संगणक प्रिंटर्स व त्यासंबंधीत इतर साधनसामुग्री महामंडळामार्फतच खरेदी करणे अनिवार्य आहे. त्यानुसार, मंडळाच्या मुख्यालय, विभागीय व जिल्हा कार्यालयांकरीता आवश्यक असलेले ९९ संगणक व ५२ प्रिंटर्स खरेदी करुन मंडळास पुरवठा करुन देण्याबाबत मंडळाच्या दि. ०८.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान यांना कळविण्यात आले होते. तसेच, दि. १०.०२.२०१७ व दि.२७.०४.२०१७ रोजीच्या स्मरणपत्रान्वये कळवून सुध्दा बराच कालावधी उलटून गेल्यानंतरही त्यांच्याकडून मंडळास आवश्यक असलेले संगणक व प्रिंटर्स पुरविण्यात आलेले नाहीत.

तसेच, मंडळाकडे सद्य:स्थितीत उपलब्ध असलेल्या कर्मचारी व अपूरी संगणकाची संख्या तसेच, जुन्या संगणकांवर नादुरुस्त होवून दुरुस्तीवर होणारा ज्यादा खर्च त्यामुळे दिवसेंदिवस मंडळाच्या कामाचा वाढता व्याप पाहता अपूऱ्या संगणक व प्रिंटर्सच्या संख्येमुळे मंडळाच्या बांधकाम कामगारांच्या नोंदणी प्रक्रिया व दैनंदिन कामकाजावर त्याचा परिणाम होत असल्याने सहाय्यक कामगार आयुक्त, अमरावती, कामगार उप आयुक्त, पुणे, कामगार उप आयुक्त, मुंबई शहर या जिल्हा कार्यालयाकडून संगणक व प्रिंटर्स उपलब्ध करुन देण्याबाबत व खरेदी करण्यास मान्यता मिळण्याबाबतचे प्रस्ताव मंडळाकडे प्राप्त झालेले आहेत.

तसेच, मंडळाच्या प्रत्येक, विभागीय व जिल्हा कार्यालयांकरीता आवश्यक असलेले Intel Core i३ All in One Desktop Computers Think Center M७३z या कंपनीचे प्रत्येकी २ संगणक व Samsung SL-M२०७१F या कंपनीचा प्रत्येकी १ मोठा प्रिंटर (स्कॅनर, झेरॉक्स्, प्रिंट) विभागीय व जिल्हा कार्यालयास दरपत्रकाप्रमाणे स्थानिकरीत्या खरेदी करण्याकरीता सदर कार्यालयांना एकुण रु. १,०२,९४५/- एवढा खर्च अपेक्षित आहे त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अनु क्र. | कार्यालय | संगणकाची संख्या | प्रिंटर्स ची संख्या | संगणकाची किंमत | प्रिंटर्सची किंमत | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विभागीय कार्यालय कोकण(मुंबई)/नागपूर /पुणे/नाशिक/ औरंगाबाद | प्रत्येक विभागीय कार्यालयास २ संगणक | प्रत्येक विभागीय कार्यालयस १ मोठे प्रिंटर्स (स्कॅनर, झेरोक्स्, प्रिंट) | इंटेल कोर i३M७३z या कंपनीचे प्रत्येकी एका संगणकाची किंमत ४६०००/- | Samsung SL-M२०७१F या कंपनीचे प्रत्येकी एका प्रिंटर्स ची किंमत १०,९४५/- | १,०२,९४५/- |
| २ | ४२ जिल्हा कार्यालय | प्रत्येक जिल्हा | प्रत्येक जिल्हा | इंटेल कोर i३M७३z | Samsung SL- | १,०२,९४५/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कार्यालयास २ संगणक | कार्यालयास १ मोठा प्रिंटर्स (स्कॅनर, झेरोक्स्, प्रिंट) | या कंपनीचे प्रत्येकी एका संगणकाची किंमत ४६०००/- | M२०७१F या कंपनीचे प्रत्येकी एका प्रिंटर्स ची किंमत १०,९४५/- | |

तरी, मंडळाचे विभागीय व जिल्हा कार्यालयांकडील अपुऱ्या संगणक व प्रिंटर्सच्या अभावी मंडळाच्या बांधकाम कामगारांच्या नोंदणीवर व दैनंदिन कामकाजावर होणारा परिणाम पाहता विभागीय व जिल्हा कार्यालयांना Government e-Market (GeM) पोर्टलवरून अथवा स्थानिक पातळीवर दर पत्रके मागवून कमी दर असलेल्या पुरवठादाराकडून संगणक, प्रिंटर व स्कॅनर खरेदी व सदर खरेदीवरील खर्चाचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर .

याबाबत मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी सर्व जिल्हा कार्यालयांना दरपत्रके मागवून संगणक, प्रिंटर व स्कॅनर खरेदी न करता Government e-Market (GeM) पोर्टलद्वारे मंडळाने खरेदी करून विभागीय व जिल्हा कार्यालयांना त्याचे वितरण करण्यात यावे. त्यामूळे एकाच दराने संगणक, प्रिंटर व स्कॅनर खरेदी करण्यास मदत होईल.

तसेच, मंडळ सचिव यांनी सादर केले की, मुख्यालयाकरीता सादरीकरणासाठी एक प्रोजेक्टर घेणेही आवश्यक आहे. यावर मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी सुचित केले की, त्याच प्रद्धतीने प्रोजक्टरचीही खरेदी करावी, त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाच्या कार्यालयीन कामकाजाकरीता ५ विभागीय कार्यालयांना व ४२ जिल्हा कार्यालयांना प्रत्येकी २ संगणक, १ प्रिंटर (स्कॅनिंग सुविधेसह) मशिन तसेच मुख्यालयाकरीता आवश्यक १५ संगणक, ३ प्रिंटर (स्कॅनिंग सुविधेसह), बैठकींना सादरीकण करण्याकरीता ०१ प्रोजेक्टर, वरिष्ठ अधिकाऱ्यांकरीता ३ आयपॅड खरेदीस व त्यासाठी अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदर खरेदी Government**

e-Market (GeM) पोर्टलद्वारे करून मुख्यालय, सर्व विभागीय व जिल्हा कार्यालयांना पुरवठा करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. ११: नोंदित बांधकाम कामगारांच्या नोंदणी/ नुतणीकरणाची फी व आस्थापनांकडून जमा होणारा उपकर जमा करण्यासाठी नवीन बँक खाते उघडणेबाबत दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूर ठरावात सुधारणा करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि. २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये नोंदित बांधकाम कामगारांच्या नोंदणी/ नुतणीकरणाची फी व आस्थापनांकडून जमा होणारा उपकर जमा करण्यासाठी मंडळाचे बँक ऑफ इंडिया, ताडदेव रोड शाखा येथील खाते बंद करुन व स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये नवीन खाते उघडण्याबाबत खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

"महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाच्या दि. २२.०९.२०१७च्या बैठकीत नोंदित बांधकाम कामगारांच्या नोंदणी/ नुतणीकरणाची फी व आस्थापनांकडून जमा होणारा उपकर जमा करण्यासाठी मंडळाचे बँक ऑफ इंडिया, ताडदेव रोड शाखा येथील खाते बंद करावे व स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये नवीन खाते उघडण्यात यावे. तसेच, स्टेट बँक ऑफ इंडिया च्या प्रतिनिधींसोबत बैठक आयोजित करून मंडळासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधांबाबत त्यांच्यासोबत Service Level Agreement (SLA) करण्यात यावा. सदर बदल क्षेत्रिय कार्यालयांना त्वरीत कळविण्यात यावा. दरम्यानच्या कालावधीत क्षेत्रिय कार्यालयाकडून उपकराच्या रक्कमा बँक ऑफ इंडियाच्या जुन्या खात्यात जमा झाल्यास सदर रक्कम तातडीने मंडळाच्या स्टेट बँक ऑफ इंडियाकडील नवीन खात्यात वर्ग करण्याबाबत बँक ऑफ इंडियाला कळविण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला."

त्यानुसार, स्टेट बँक ऑफ इंडिया यांना नोंदित बांधकाम कामगारांच्या नोंदणी / नुतणीकरणाची फी व आस्थापनांकडून जमा होणारा उपकर जमा करण्याकरीता मंडळाचे नवीन बचत खाते उघडण्यासाठी त्यांच्या क्षेत्रिय कार्यालयाच्या प्रतिनिधीं सोबत संपर्क साधून दि. २५.०९.२०१७ रोजीच्या आयोजित बैठकीमध्ये मंडळासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी, सुविधांबाबत प्रस्ताव देण्यात आला व सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.०६.१०.२०१७ रोजी सादरीकरण (Presentation) करण्याबाबत निर्देश देण्यात आले. त्याप्रमाणे, दि.०६.१०.२०१७ च्या बैठकीमध्ये सदर बँकेच्या संगणक विभागाच्या टीमने मंडळासाठी उघडण्यात येणाऱ्या बचत खात्याच्या प्रस्तावानुषंगाने देण्यात येणाऱ्या सोयी, सुविधांबाबत सादरीकरण करून त्याबाबतसविस्तरचर्चा करण्यात आली परंतु, मंडळास आवश्यक असणाऱ्या सोयी,

सुविधांबाबत स्पष्टता नव्हती त्यामुळे उपस्थित बँक प्रतिनिधींनीपुढील बैठकीमध्ये बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.

दि.१२.१०.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये मंडळास अपेक्षित सादर केलेल्या प्रस्तावातील सोयी, सुविधा देण्याबाबत स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेने त्यांच्या दि.०५.१२.२०१७ च्या मेलद्वारे असमर्थता दर्शविली.

त्यामुळे मंडळाच्या दि. २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत सादर प्रस्तावातील अनु क्र. २ वरील सेंट्रल बँक ऑफ इंडियायांच्या क्षेत्रिय कार्यालयाकडे मंडळाचे बचत खाते उघडण्याबाबत संपर्क साधून बचत खात्यावर कोणत्या सोयी, सुविधा देण्यात येतील याबाबत सादरीकरण करण्याबाबत (Presentation) निर्देशित करण्यात आले. याबाबत बँकेशी दि.०४.१२.२०१७ व दि.२१.१२.२०१७ रोजी बैठका घेऊन चर्चा करण्यात आली. सदर बँकेने दि. २१.१२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये याबाबत सादरीकरण केलेले असून सदर बँकेने मंडळाच्या बचत खात्यावर मंडळास अपेक्षीत सोयी, सुविधा देण्याचे मान्य केले आहे.

याबाबत, मंडळाची आवश्यकता व त्यास अनुसरून भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया व सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांनी दिलेल्या प्रस्तावाचा तुलनात्मक तक्ता यासोबत जोडला असून या तक्त्यानुसार भारतीय स्टेट बँकेत खाते उघडण्यात आल्यास मंडळाच्या आवश्यकतेनुसार अपेक्षित सोयी, सुविधा ती बँक पुरवू शकणार नाही. मात्र सेंट्रल बँक ऑफ इंडियाकडून मंडळास सर्व अपेक्षित सोयी, सुविधा दिल्या जाणार आहेत. व तसा मंडळासोबत करारनामा Service Level Agreement (SLA) करण्यास बँकेने लेखी सहमती दर्शविली आहे

या बाबी विचारात घेता मंडळाने दि.२२.०९.२०१७ रोजी मंजुर ठराव क्र. १४ अन्वये भारतीय स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये खाते उघडण्यासाठी दिलेल्या मान्यतेत बदल करून सेंट्रल बँक ऑफ इंडियामध्ये मंडळाचे नवीन बचत खाते उघडण्यास मान्यता तसेच त्याअनुषंगाने प्रणाली व इतर कामासाठी येणाऱ्या खर्चास व सदर बँकेसोबत Service Level Agreement (SLA) करण्यास मान्यतेचा प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात येत आहे.

यावर मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी मंडळाची इतर बँकामध्ये असणारी सर्व खाती बंद करून सेंट्रल बँक ऑफ इंडिया (Central Bank Of India) मध्ये नवीन खाते उघडण्यात यावे असे सुचित केले त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांच्या नोंदणी/ नुतणीकरणाची फी व आस्थापनांकडून जमा होणारा उपकर जमा करण्यासाठी नवीन बँक खाते उघडणेबाबत दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूर ठरावात सुधारणा करून स्टेट बॅक ऑफ इंडिया ऐवजी सेंट्रल बँक ऑफ इंडिया (Central Bank Of India) मध्ये मंडळाचे खाते उघडण्यात यावे, सदर बदल क्षेत्रिय कार्यालयांना त्वरीत कळविण्यात यावा. तसेच मंडळाची इतर बँकामध्ये असणारी खाती बंद करण्यात येवून आवश्यक असणारी खाती सेंट्रल बँक ऑफ इंडिया मध्ये उघडण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. १२: राज्य शासनाच्या दिनांक ०७.१२.२०१७ च्या परित्रकान्वये दिनांक २४.१०.२०१३ व दिनांक ०८.११.२०१६ रोजी निर्गमित केलेली परिपत्रके सुधारित करण्यात आली आहेत त्यास अनुसरून मंडळाने करावयाच्या कार्यवाहीबाबत**

याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्रमांक :- इमारत-२०१३/प्र.क्र.२२४/कामगार-७ अ दि.२४.१०.२०१३ अन्वये महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने पारित केलेल्या योजनांची/ ठरावांची अंमलबजावणी करण्यापूर्वी शासनाची पर्व अनुमती घेण्यात यावी. मंडळाच्या दैनंदिन खर्चासाठी मात्र सदर आदेश लागू राहणार नाहीत. सदर परिपत्रकातील सूचनांची काटेकोर पणे अंमलबजावणी करण्याबाबत मंडळाचे अध्यक्ष/ सदस्य सचिव यांनी तातडीने योग्य ती कार्यवाही करावी. असे निर्देश दिलेले आहेत.

उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्रमांक :- इबामं-२०१६/प्र.क्र.३३८/काम-७ दि.०८.११.२०१६ अन्वये मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचा कृती आराखडा खालील बाबींची तपासणी/ सखोल चाचणी करून तसे प्रस्तावात खालील बाबींचा समावेश करून शासन मान्यतेस सादर करण्याबाबत निर्देशित केले आहे.

१. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबवावयाच्या योजनांचे प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करताना त्याबाबतची कायदेशीर तरतूद स्पष्ट स्वरूपात नमूद करावी.
२. बांधकाम कामगरांकरीता मंडळाने एखादी योजना राबविण्याचा ठराव पारित केल्यास त्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यापूर्वी अशी योजना पूर्वापार चालत आलेली आहे, अथवा योजना नवीन स्वरूपाची आहे, याबाबत प्रस्तावात स्पष्टपणे नमूद करण्यात यावे.

३. अ) पूर्वापार चालत असलेल्या योजनेत खालील बाबींचा अंतर्भाव असावा

I) पूर्वापार चालत असलेल्या योजनांचे नाव

II) योजना चालवणाऱ्या विभागाचे नाव

III) योजना क्रियान्वित करणाऱ्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांचे पद

४. ब) नवीन योजना प्रस्तावित करतांना खालील बाबींचा अंतर्भाव करावा

I) कायद्याची तरतूद

II) योजनांचा कृती आराखडा

III) योजनांकरीता लाभार्थी निवडीचे निकष

IV) प्रस्तावित योजनेकरीता आवश्यक तरतूद आणि त्याबददल केलेली अर्थसंकल्पीय तरतूद

V) योजनांचा लाभ

५. कोणतीही योजना मंडळामार्फत राबविण्याचा ठराव पारित केल्यानंतर, अशा योजनांसंदर्भात इतर राज्ये, मा. न्यायालये यांचे काही आदेश न्यायनिर्णय आहेत काय, याबाबतचा सविस्तर तपशील प्रस्तावात सुस्पटष्टपणे देण्यात यावा.

६. मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता कोणतीही योजना नवीन स्वरूपात राबवावयाची असल्यास अशा प्रकारच्या पूर्वीच्या योजनेची द्विरूक्ती होत नसल्याबाबत प्रस्तावात स्पष्टपणे नमुद करावे आणि सचिवांकडून प्रमाणित करून घ्यावे.

७. मंडळाने पारित केलेल्या ठरावास अनुसरून प्रस्ताव शासन मान्यतेस पाठविताना असे प्रस्ताव कामगार आयुक्त यांनी मुख्य निरीक्षक या नात्याने प्रमाणित तसेच स्वयंस्पटष्ट अभिप्रायासह पाठवावे.

उक्त शासन परिपत्रकान्वये मंडळ बैठकीत पारित ठरावानुसार कल्याणकारी योजनांची प्रस्ताव शासनास सादर केले जातात. सदर दोन्ही शासन परिपत्रकांमुळे मंडळाच्या कामकाजावर प्रभावी परिणाम झाल्याचे दिसून येत नसल्यामुळे मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दि.२८ जून ०१७ रोजीच्या बैठकीत मंडळाचे कामकाज गतीने होण्यासाठी सदर दोन्ही परिपत्रके रदद करून सुधारित करण्याच्या कामगार विभागास सूचना देण्यात आल्या होत्या.

त्यास अनुसरून कामगार विभागाने, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्र.इबांका २०१७/प्र.क्र.३८६/ कामगार-७ दि.०७.१२.२०१७ अन्वये शासनाने दि.२४ ऑक्टोबर २०१३ व दि.०८ नोंव्हेबर २०१६ रोजी निर्गमित केलेली परिपत्रके सुधारित केलेले आहेत. तथापि, कोणत्याही परिस्थितीत मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे , इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६,, मा. सर्वोच्च न्यायालयाचे किंवा इतर कोणत्याही मा. न्यायालयाचे, केंद्र शासनाने वेळोवळी दिलेले निर्देश आणि शासनाने निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय व परिपत्रक यांचे उल्लघंन होणार नाही, याची खबरदारी मंडळाने घ्यावी. प्रसंगी केवळ असेच प्रस्ताव सादर व्हावेत ज्यांची शासन

मान्यतेची आवश्यकता राहील. तसेच आवश्यक त्या योजनांकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करून संस्था निश्चितीस शासनाची मान्यता घ्यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

उक्त शासन परिपत्रकास अनुसरून मंडळाने करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१. नोंदीत बांधकाम कामगारांकरीता मंडळाकडून नवीन योजना कार्यनिव्त करावयाच्या असल्यास विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करून प्रथम शासन मान्यता प्राप्त करावी. तसेच, कार्यन्वित योजनांच्या निकषात बदल करणेबाबत मंडळ बैठकीत ठराव पारित केल्यास त्यास शासन मान्यता प्राप्त करावी.

२. सद्यस्थितीत शासन मान्यतेने मंडळस्तरावर कार्यन्वित व भविष्यात मंजूर होणाऱ्या योजनांचे निकष व मंजूर आर्थिक निकषानुसार लाभ वाटपाचे काम मंडळस्तरावरून करण्यात यावेत. सदर लाभ वाटपाकरीता क्षेत्रिय कार्यालयांची मदत घेण्यात यावी.

३. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८.०६.२०१७ रोजी संपन्न् बैठकीच्या इतिवृत्तांतातील मुद्दा क्र.०४ नुसार योजना कार्यन्वयनांसाठी संस्था निश्चितीकरीता आवश्यक निविदा, अटी शर्ती व संस्था निश्चितीचा प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त करावी.

४. महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामागर कल्याणकारी मंडळाने पारित केलेले ठरावास (इतिवृत्त) शासनाची पर्व अनुमती घेण्याऐवजी मुद्दा क्र.०३ प्रमाणे स्वतंत्र प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावे तसेच मंडळ बैठकीच्या इतिवृत्तांताची प्रत माहितीस्तव शासनास सादर करावी.

५. शासन स्तरावरून विविध योजनांकरीता मंजूर आर्थिक निकषाशिवाय मंडळ स्तरावर अन्य बाबींवरील खर्चाकरीता वित्तीय अधिकार प्रदान करणेबाबत मंडळाच्या बैठकीत विचारविनिमय करून निर्णयार्थ सादर.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: १. नोंदीत बांधकाम कामगारांकरीता मंडळाकडून नवीन योजना कार्यनिव्त करावयाच्या असल्यास विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करून प्रथम शासन मान्यता प्राप्त करावी. तसेच, कार्यन्वित योजनांच्या निकषात बदल करणेबाबत मंडळ बैठकीत ठराव पारित केल्यास त्यास शासन मान्यता प्राप्त करावी.**

२.सद्यस्थितीत शासन मान्यतेने मंडळस्तरावर कार्यान्वित व भविष्यात मंजूर होणाऱ्या योजनांचे निकष व मंजूर आर्थिक निकषानुसार लाभ वाटपाचे काम मंडळस्तरावरून करण्यात यावेत. सदर लाभ वाटपाकरीता क्षेत्रिय कार्यालयांची मदत घेण्यात यावी.

३. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८.०६.२०१७ रोजी संपन्न् बैठकीच्या इतिवृत्तांतातील मुद्या क्र.०४ नुसार योजना कार्यन्वयनांसाठी संस्था निश्चितीकरीता आवश्यक निविदा, अटी शर्ती व संस्था निश्चितीचा प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त करावी.

४. महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामागर कल्याणकारी मंडळाने पारित केलेले ठरावास (इतिवृत्त) शासनाची पर्व अनुमती घेण्याऐवजी मुद्या क्र.०३ प्रमाणे स्वतंत्र प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावे तसेच मंडळ बैठकीच्या इतिवृत्तांताची प्रत माहितीस्तव शासनास सादर करावी.

५.शासन स्तरावरून विविध योजनांकरीता मंजूर आर्थिक निकषाशिवाय मंडळ स्तरावर अन्य बाबींवरील खर्चाकरीता वित्तीय अधिकार प्रदान करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावा.

वरीलप्रमाणे ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. १३: बांधकाम परिसरातील उपयोगात आणण्यात येणाऱ्या उचलयंत्राची (lifting Tackles) व् दाबयंत्राची (Pressure vessels) सुरक्षेबाबत तपासणी करण्यासाठी सक्षम व्यक्तीची नेमणूक करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांना असे सांगितले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम ३८ मध्ये सेप्टी कमिटी आणि सेप्टी ऑफिसर्स बाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

(1) In Every establishment wherein five hundred or more building workers are ordinarily employed, the employer shall constitute a safety Committee consisting of such number of representatives of the employer and the building workers as may be prescribed by the State Government.Provided that the number of persons representing the workers shall, in no case, be less than the persons representing the employer.

(2) In every establishment referred to in sub section (1), the employer shall also appoint a safety officer who shall possess such qualifications and perform such duties as may be prescribed.

➢ बांधकाम परिसरातील उपयोगात आणण्यात येणाऱ्या उचलयंत्राची व दाबयंत्राची तपासणी न केल्यामुळे खालीलप्रमाणे अपघात होत असल्याचे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातील सेवानिवृत्त सहसंचालक श्री. अनिल कांबळे यांच्या दि.२६.१२.२०१७ रोजीच्या अहवालात नमूद केले आहे.

अ) उचलयंत्राची तपासणी न केल्यामुळे होणारे अपघात

1. Failure of "D" Shackles
2. Toppling of Cranes/ Hydra/Tower Cranes
3. Fall of Load due to poor maintence/use if non-standard crane accessories
4. Breaking of Wire rope slings/manila rope
5. Failure of sheave pulley blocks
6. Failure of winch machines
7. Failure of derrick poles
8. Failure of lifting laod hooks
9. Failure of Turn Buckles

ब) दाबयंत्राची तपासणी न केल्यामुळे होणारे अपघात

1. Bursting of compressed air tan installed on tractor excavation work.
2. Bursting of air vessel during painting work.
3. Bursting of air compressor vessel while air filling in tyres of various trucks/ loaders/ tippers/ Hywas etc.

क) बांधकामाच्या ठिकाणचे अन्य अपघात

1. Fall from Height
2. Collapse of scaffolding
3. Electrocution
4. Release of any poisonous gases while excavation work near drainages/cleaning inside drainages.
5. Fall of excavations/concentrate mixtures in excavated drain lines.
6. Collapse of loose soil near excavated areas/fall into excavations.
7. Striking of heavy vehicles against each other or on public road transferring material/labours
8. Use of unsafe LPG cylinders in gas cutting/ welding work.
9. Unsafe platforms with out railings/toe guards/safety guards.
10. Bar-cutting machines without guards/without eathing
11. Use of non-standard hand tools
12. Use of temporary electric power connections/unsafe pump connections.
13. Workers working without required PPE's like safety Helemt, Safety Shoes, Hand Gloves, Gum Boots, Safety bels/Harness/ Life Systems etc.

तथापि, कंत्राटदारामार्फत मंडळाच्या अधनियमातील कलम ३८ चे पालन न केल्यामुळे बांधकामाच्या ठिकाणी अपघात होत असल्याचे वारंवार दिसून येते. त्यामुळे इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या अधिनियमाच्या कलम ३८ प्रमाणे कार्यवाहीची तपासणी करण्याची आवश्यकता आहे.

त्या अनुषंगाने, महाराष्ट्रातील बांधकामाच्या ठिकाणी उपरोक्त तांत्रिक बाबींच्या तपासणीसाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत प्रथम टप्प्यात संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचानालयातील सेवा निवृत्त, सहसंचालक/ उपसंचालक या संवर्गातील अधिकाऱ्यांपैकी इच्छुक अधिकाऱ्यांची प्रत्येक प्रादेशिक विभागाकरीता ०१ याप्रमाणे ०६ विभागाकरीता ०६ सेवा निवृत्त, सहसंचालक/ उपसंचालक

यांची सामान्य प्रशासन विभागातील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७.१२.२०१६ अन्वये नेमणूक करावी. सदर अधिकाऱ्याने बांधकामाच्या ठिकाणी भेट देऊन उपरोक्त ०३ प्रकारचे अपघात घडणार नाही याबाबत संबंधितांना सूचना देऊन असे अपघात टाळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी व त्याबाबत मंडळाच्या अधिनियमातील कलम ३८ नुसार कंत्राटदाराने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दरमहा मंडळास सादर करावा,मंडळास सादर केलेला अहवाल मंडळाच्या बैठकीत सादर करून पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यात यावा, असे प्रस्तावित आहे.

बांधकाम परिसरातील उपयोगात आणण्यात येणाऱ्या उचलयंत्राची (lifting Tackles) व दाबयंत्राची (Pressure vessels) सुरक्षेबाबत तपासणी करण्यासाठी व मंडळाच्या अधिनियमातील कलम ३८ नुसार कंत्राटदाराने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राप्त करण्यासाठी यथाप्रस्तावित संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचानालयातील सेवा निवृत्त, सहसंचालक/ उपसंचालक यांच्या नेमणूकीबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर.

यावर मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी यासंदर्भात सर्व जिल्हा कार्यालयातील सरकारी कामगार अधिकारी यांची बैठक घेऊन यासंदर्भात माहिती देण्यात यावी असे सुचविले. त्यावर मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी आपल्या उपस्थितीत बैठक घेणार असल्याचे सांगितले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: बांधकाम परिसरातील उपयोगात आणण्यात येणाऱ्या उचलयंत्राची (lifting Tackles) व दाबयंत्राची (Pressure vessels) सुरक्षेबाबत तपासणी करण्यासाठी संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयतील सेवानिवृत्त सहसंचालक/ उपसंचालक या संवर्गातील अधिकाऱ्यांची यादी प्राप्त करून त्यांची संमती मागवून प्रत्येक विभागात ०२ याप्रमाणे सेवानिवृत्त सहसंचालक/ उपसंचालक यांची सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १६.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील अटी/ शर्तीनुसार नेमणूक करण्यात यावी. तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने कारखान्यातील उचलयंत्रे, दाबयंत्रे व इतर यंत्राची तपासणी करण्यासाठी कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम २ (ca) नुसार १४८ सक्षम व्यक्तीचा (Competent Person) ची नेमणूक केलेली आहे. सदर नियुक्त व्यक्तींची माहिती प्राप्त करून बांधकामाशी संबंधित तांत्रिक बाबींची तपासणी करण्यासाठी योग्य व्यक्तींना**

तपासणीकरीता प्राधिकृत करण्यासही मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र. १४: बांधकाम कामगारांच्या नोंदणीचा आढावा घेणे**

सदर विषयाबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम १२ (०१) अन्वये बांधकाम कामगारांची मंडळात नोंदणी केली जाते. माहे मार्च २०१७ अखेर ५.९३ लक्ष इतक्या बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळात झालेली आहे. मंडळात नोंदीत बांधकाम कामगारांची नोंदणी अधिकाधिक व्हावी याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही मंडळामार्फत करण्यात आलेली आहे.

१. बांधकाम कामगारांची नोंदणी होताच रू.५०००/- चे अर्थसहाय्य प्रती कुटूंब अवजारे खरेदी करण्याकरीता मार्च, २०१७ पासून देण्यात येत असल्यामुळे नवीन बांधकाम कामगारांची मोठया प्रमाणावर नोंदणी होण्यास मदत होत आहे. या योजनेसाठी मे- जून २०१७ मध्ये सर्व जिल्हा कार्यालयांना रू.११८ कोटी इतका निधी वाटप करण्यात आलेला आहे.

२. मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना कौशल्य वृध्दीकरण योजना (RPL Scheme) मार्च २०१७ पासून राज्यात सुरू करण्यात आलेली आहे. देशपातळीवरील पाच प्रशिक्षण संस्था बांधकामाच्या ठिकाणी जाऊन कौशल्य वृध्दीचे प्रशिक्षण देत आहेत. तसेच सदर संस्था अनोंदीत बांधकाम कामगारांची नोंदणी करून त्यांनाही प्रशिक्षण देत आहेत. त्यामुळे नोंदणी वाढण्यास मदत होत आहे.

३. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय दि.२१.०९.२०१६ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना लागू करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दि.०२.०६.२०१७ अन्वये सदर योजना नोंदीत बांधकाम कामगारांना लागू करण्यात आलेली आहे. ज्या नोंदीत बांधकाम कामगाराकडे शिधापत्रिका नाही अशा बांधकाम कामगारांची विमा हप्त्याची रक्कम कळविण्याबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटीस वारंवार विनंती करण्यात आलेली आहे. त्यानुसार कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

४. मा. सर्वोच्च् न्यायालयाचे आदेशानुसार नोंदणीकृत बांधकाम कामगार संघटनांची मदत व सहाय्य घेऊन बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविणे व जास्तीत जास्त बांधकाम कामगारांना लाभ वाटप करणेबाबत शासनाच्या दि.१५.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रिय

कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत त्यामुळे बांधकाम कामगारांची नोंदणी व लाभ वाटपामध्ये वाढ होण्यास मदत होणार आहे.

५. नगरविकास विकास व ग्रामविकास विभागामार्फत बांधकाम कामगार नोंदणीकरीता ९० दिवसांचे प्रमाणपत्र देण्याविषयीचे आदेश Campaign Mode ऐवजी कायमस्वरूपी लागू करणेबाबत नगरविकास विभागाने दि.२७.०६.२०१७ व ग्रामविकास विभागाने दि.२२.०९.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित केले आहे. त्यामुळे नवीन बांधकाम कामगारांच्या नोंदणीत वाढ होण्यास मदत होणार आहे.

६. बांधकाम कामगारांच्या व्याख्येत बांधकामाशी संबंधित २१ कामे अंतर्भूत करण्याबाबत उद्योग, उर्जा व कामगार विभागने दि.१८.०८.२०१७ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. त्यामुळे नवीन बांधकाम कामगारांच्या नोंदणीत वाढ होण्यास मदत होत आहे.

७. नोंदणी व लाभाचे वाटप परिणामकारक होण्यासाठी जिल्हा स्तरावर नोंदणी व लाभ वाटपाचा नियमित आढावा घेऊन अंमलबजावणी मधील सर्व अडीअडचणी दूर करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संनियंतत्रण समितीचे पुनर्गठण करण्यात आलेले आहे. सदर समितीमध्ये मा.पालक मंत्री यांनी सुचविलेले ०१ विधानसभा/ विधानपरिषद सदस्य, मंडळाचे सदस्य, महापालिका आयुक्त व अन्य विभागाच्या विभाग प्रमुखाचा समावेश करण्यात आलेला आहे . सदर शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभागाने दि.०६.१२.२०१७ रोजी निर्गमित केलेला आहे. त्यामुळे जिल्हयातील बांधकाम आस्थापनांची नोंदणी, बांधकाम कामगारांची नोंदणी, बांधकाम कामगारांकरीता लाभ वाटपात निश्चित वाढ होईल.

८. मंडळाच्या ठरावानुसार बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी दरमहा जिल्हयातील एका तालुक्यात नोंदणीचे कॅम्प आयोजित करण्यात येत आहे. त्यामुळे नवीन बांधकाम कामगारांच्या नोंदणीत वाढ होण्यास मदत होत आहे.

९. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकरी मंडळातील नोंदीत जिवीत बांधकाम कामगारांना त्यांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा संच (Safety Kit) पुरविणेबाबत दि.२३.११.२०१७ रोजी व अत्यावश्यक संच (Essential kit) पुरविण्याबाबत

दि.२२.११.२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे व पुरवठादार संस्था निश्चितीकरीता पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

१०. मंडळाकडे जास्तीत जास्त कामगारांची नोंदणी व्हावी या उददेशाने बाहय स्त्रोत यंत्रणेद्वारे माहिती तंत्रज्ञानावर आधारीत एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित करणे व जिल्हा स्तरावर ४० सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेची नेमणूक करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव राज्य शासनाच्या उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेस सादर करण्यात आलेला आहे.

११. बांधकाम कामगारांना मंडळाच्या योजनेत जास्तीत जास्त लाभ देण्याकरीता मंडळामार्फत जनजागृती मोहिम आयोजित करावयाचा वार्षिक आराखडा दि.१६.१२.२०१७ रोजी शासन मान्यतेस सादर करणे प्रस्तावित आहे.

१२. बांधकाम कामगारांच्या पाल्यासाठी बांधकामाच्या ठिकाणी मोबाईल डे-केअर (Mobile day Care) सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाची तत्वत: मान्यता दि.१२.०९.२०१७ रोजी प्राप्त झाली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

१३. बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाची तत्वत: मान्यता दि.१२.०९.२०१७ रोजी प्राप्त झाली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

१४.नोंदीत बांधकाम कामगारांना सायकल खरेदीकरीता अनुदान वाटप करण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाची तत्वत: मान्यता दि.१२.०९.२०१७ रोजी प्राप्त झाली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

१५. प्रधानमंत्री आवास योजनेत पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना केंद्र शासनाकडून १.५ लक्ष व राज्य शासनाकडून रू.१ लक्ष याशिवाय मंडळाकडून रु.२ लक्ष एवढे अनुदान देणेबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस दि.२७.१०.२०१७रोजी सादर करण्यात आलेला आहे.

१६. मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना प्रथम टप्पयात एमएमआरडीए क्षेत्रात सवलतीच्या दरात भाडेतत्वावर घरे उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस दि.२२.०६.२०१७ रोजी सादर करण्यात आलेला आहे.

१७. राज्यातील सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती व सर्व मुख्याधिकारी नगरपरिषद/ सर्व वॉर्ड ऑफिसर महानगरपालिका, उपअभियंता, कामगार कल्याण मंडळाचे अधिकारी, कामगार विभागाचे अधिकारी यांना इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम १२ (२) नुसार नोंदणी अधिकारी म्हणून घोषित करणे प्रस्तावित आहे.

१८. बांधकामाशी संबंधित सर्व शासकीय विभागे, मंडळे, महामंडळे यांचेमार्फत करण्यात येणाऱ्या बांधकाम आस्थापनांची तसेच त्यावरील कामगारांची नोंदणी मंडळाकडे अनिवार्य करणे तसेच बांधकामावरील १ % उपकर मंडळाकडे जमा करणे अनिवार्य करणे प्रस्तावित आहे.

१९. मंडळाचे मुख्यालय, ०६ प्रादेशिक कार्यालये व ४० जिल्हा कार्यालयांकरीता ४१९ पदांचा सुधारित आकृतीबंध मंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आलाअसून शासन मान्यता प्राप्त करून पदे भरण्याबाबतची कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.

२०. नोंदीत बांधकाम कामागारांच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील रू.६.०० लक्ष पर्यंतच्या व्याजाची रक्कम अथवा रू.२.०० लक्ष मंडळामार्फत देणे प्रस्तावित आहे.

माहे मार्च २०१७ नंतर मंडळात नोंदीत बांधकाम कामगारांची नोंदणी जास्तीत जास्त व्हावी याकरीता मंडळामार्फत उक्त मुद्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यानुसार माहे नोव्हेंबर अखेर ६.९४ लक्ष बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळात झालेली आहे. त्यापैकी ३.४७ लक्ष बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत असून कोकण विभाग, मुंबई विभाग व अपूपर कामगार आयुक्त, पुणे विभाग यांची नोंदणीची माहिती ऑक्टोबर अखेर उपलब्ध असून त्याबाबतचा जिल्हानिहाय तपशील माहितीकरीता सादर करण्यात आला.

यावर मा. प्रधान सचिव यांनी जिवित नोंदित कामगारांची संख्या फारच कमी असल्याबाबत मत व्यक्त केले. त्यास अनुसरून नोंदणीत वाढ करण्याबाबत उपाययोजना

करण्यात याव्यात असे मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी सुचित केले. यावर मा. प्रधान सचिव यांनी सुचित केले की, बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी एक महिन्याचे विशेष नोंदणी अभियान प्रथम विभागीय स्तरावरील जिल्हा कार्यालयात राबविणे योग्य राहील. यावर मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय यांनी असे निर्देशित केले की, माहे फेब्रु / मार्च २०१८ मध्ये सदर अभियान राबविण्यात यावे.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाच्या बैठकीत सादर केलल्या माहे नोव्हेंबर २०१७ अखेर जिल्हानिहाय नोंदणीच्या तपशिलाची मंडळाकडून नोंद घेण्यात आली, तसेच बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी प्रथम टप्प्यात मुंबई (MMR क्षेत्र), पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या सहा जिल्हयात माहे फेब्रु / मार्च २०१८ या कालावधीत एक महिन्याचे विशेष नोंदणी अभियान राबविण्यात यावे. सदर अभियानाकरीता त्या त्या विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा घेण्यात याव्यात. तसेच, अभियानाच्या प्रसार, प्रसिद्धी व नियोजनाकरीता माहिती व जनसंपर्क विभागाच्या शासन निर्णय दिनांक १४.०७.२०१६ अन्वये नियुक्त संस्थेपैकी एका संस्थेची निवड करून मदत घेण्यात यावी. सदर अभियानाकरीता अंदाजित रु. ५ कोटी एवढ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र. १५: मंडळाच्या सन २०१४-१५ च्या वार्षिक अहवालास मान्यता देणे.**

सदर विषयाबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील नियम २७ अन्वये मंडळाच्या आर्थिक वर्षातील कामकाजाचे लेखा व लेखापरीक्षण अहवाल प्रत्येक वर्षी विधीमंडळात ठेवण्यासाठी शासनास सादर करणे आवश्यक आहे.

त्यानूसार मंडळाच्या दि. ०५.१२.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र. १ अन्वये सन २००७-०८ ते २०११-१२ या आर्थिक वर्षाच्या लेखा/लेखापरीक्षण अहवाल व वार्षिक अहवालास मान्यता प्रदान करण्यात आली होती व सदर अहवाल मंडळाच्या दि. ०५.०१.२०१७ च्या पत्रान्वये शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. शासन मान्यते नंतर सदर अहवाल विधीमंडळात ठेवण्यासाठी दि. ३०.०३.२०१७ च्या पत्रान्वये छापील प्रतिसह शासनास सादर करण्यात आले होते.

शासन स्तरावरून दि. ११.०५.२०१७ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार सदर अहवालाचे भाषा संचालनालयाकडून मराठीत भाषांतर करून ते दि. ०३.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये शासनास पुन:श्च् सादर करण्यात आले. शासनाच्या दि. १५.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर वर्षाचे वार्षिकअहवाल विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात दि. ११.०८.२०१७ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर सादर केल्याचे कळविण्यात आले आहे.

मंडळाचे सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षाचे सनदी लेखापालांनी केलेल्या लेखा व लेखापरीक्षण अहवालावरून सदर वर्षाचे वार्षिक अहवाल तयार करण्यात आलेले होते व सदर अहवालात मंडळाच्या दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीतील मुद्दा क्र.१४ नूसार मान्यता प्रदान करण्यात आलेली असून सदर वर्षाचे संव्यवहार लेखापरीक्षण (Transaction Audit) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांजकडून माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये पुर्ण करण्यात आलेले आहे. परंतु, त्याचा लेखापरीक्षण अहवाल अद्याप अप्राप्त् आहे, तो प्राप्त् होताच सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षाचे वार्षिक अहवाल लेखापरीक्षण अहवालासह विधीमंडळाच्या आगामी अधिवेशनात ठेवण्यासाठी शासनास सादर करण्यात येतील.

मंडळाचे सन २०१४-१५ या वर्षाचा लेखाअहवाल सनदी लेखापालांकडून पुर्ण करून घेण्यात आला असून त्यानूसार सदर वर्षाचे वार्षिक अहवाल तयार करण्यात आला आहे. त्याचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांजकडून संव्यवहार लेखापरीक्षण करून ते

विधीमंडळात सादर करण्यापूर्वी त्यास मंडळाची मान्यता प्रदान होणे आवश्यक आहे. तरी, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल मंडळाच्या मान्यतेस्तव सादर.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाच्या सन २०१४-१५ च्या वार्षिक अहवालास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र. १६: केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त पत्र/परिपत्रके/ शासन आदेश मंडळाच्या माहितीस्तव सादर करणे.**

मंडळाच्या दि.२२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीनंतर केंद्र शासन व राज्य शासनाकडून खालील पत्र/ परिपत्रके/ शासन आदेश मंडळास प्राप्त झालेली आहेत.

| अ.क्र. | विषय | पत्र क्र. |
|---|---|---|
| १. | नोंदीत बांधकाम कामगारांना PMJJY आणि PMSBY या योजनांचा लाभ एलआयसी मार्फत देणेबाबत | D.O.No.M-२१०१५/०२/२०१७-RW (Pr.२) दि.११.१२.२०१७ |
| २. | केंद्र शासन, श्रम एवं रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली येथे पार पडलेल्या ०८ व्या संनियंत्रण समितीच्या बैठकीचे इतिवृत्तांत | दि.१२.१२.२०१७ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांताची प्रत ई-मेलद्वारे प्राप्त झाली आहे. |
| ३. | मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविण्याच्या योजनेस शासन मान्तया देण्याबाबत | उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.इबांका-२०१७/ प्र.क्र.४८३/ काम-७ दि.२२.११.२०१७ |
| ४. | मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना सुरक्षा संच (Safety Kit) पुरविण्याच्या योजनेस शासन मान्यता देण्याबाबत | उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.इबांका-२०१७/ प्र.क्र.४८२/ काम-७ दि.२३.११.२०१७ |
| ५. | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी मंडळात करण्यासाठी स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय समन्वय समितीचे पुनर्गठन करणे व तिची कार्यकक्षा वाढविणेबाबत | उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.इबांका २०१७/प्र.क्र.२७९/ कामगार-७ दि.०६.१२.२०१७ |
| ६. | कामगार विभागाची दिनांक २४ ऑक्टोबर २०१३ व दि.०८ नोव्हेंबर २०१६ रोजी निर्गमित केलेली परिपत्रके सुधारित करणेबाबत | उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्र. इबांका २०१७/ प्र.क.३८६/ कामगार-७ दि.०७ डिसेंबर २०१७ |
| ७. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम | उद्योग, उर्जा व कामगार विभाग पत्र क्रमांक :- इबांक-२०१७/ प्र.क्र.३७१/ |

| | | |
|---|---|---|
| | कामगारांना सायकल खरेदी/ मोबाईल डे केअर/ मध्यान्ह भोजन / बांधकाम ठिकाणाचे GIS Mapping योजना राबविण्याकरीता शासन मान्यता देणेबाबत | काम-७ दि.०८.१२.२०१७ |

उक्त तक्त्यानुसार केंद्र शासन/ राज्य शासन यांचेमार्फत प्राप्त झालेल्या पत्र/परिपत्रक/ शासन आदेशाची प्रत मंडळाच्या माहितीकरीता सोबत सादर करण्यात येत आहे.
सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त पत्र/परिपत्रके/ शासन आदेश मंडळाच्या माहितीस्तव सादर करण्यात आला होता. सदर केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त पत्र/परिपत्रके/ शासन आदेशाची मंडळ सदस्यांकडून नोंद घेण्यात आली.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. १७: आयत्यावेळचे विषय.**

**विषय क्र.१७.१: दिनांक १२.१२.२०१७ रोजी केंद्र शासन श्रम एवं रोजगार मंत्रालय नवी दिल्ली येथे आयोजित केलेल्या ८ व्या सनियंत्रण समितीच्या बैठकीतमध्ये सादर करण्यात आलेली माहिती मंडळाच्या माहितीकरीता सादर**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, केंद्र शासनाच्या श्रम एवं रोजगार मंत्रालय नवी दिल्ली येथील दि.१२.१२.२०१७ रोजीच्या ०८ व्या संनियंत्रण समितीच्या बैठकीत मंडळामार्फत खालील प्रमाणे माहिती सादर करण्यात आलेली असून सदर माहिती मंडळाच्या अवलोकनार्थ सादर.

| अ.क्र | विषय | सादर केलेली माहिती |
|---|---|---|
| १. | केंद्र शासनाच्या श्रम एवं रोजगार मंत्रालय नवी दिल्ली येथील दि.१२.१२.२०१७ रोजीची ०८ वी संनियंत्रण समितीची बैठक | सदर बैठकीत मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचा मागील ०३ वर्षाचा तपशील सादर करण्यात आलेला आहे. |
| २. | अनु. क्र.०१ नुसार सदर संनियंत्रण समितीची बैठक | सदर बैठकीत मंडळाशी संबंधित सर्वोच्च न्यायालय येथील याचिका क्र.३१८/२००६ संबंधित उपस्थित मुद्यातील परिच्छेदनिहाय अभिप्राय सादर करण्यात आलेले आहेत. |
| ३. | त्रैमासिक अहवाल सादर करणे | दि.१२.१२.२०१७ रोजीच्या संनियंत्रण समितीच्या बैठकीत माहे जुलै २०१७ ते संप्टेबर २०१७ चे त्रैमासिक अहवाल सादर करण्यात आलेले आहेत. |

केंद्र शासनास सादर केलेली माहिती मंडळाच्या माहितीकरीता सादर

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: दिनांक १२.१२.२०१७ रोजी केंद्र शासन श्रम एवं रोजगार मंत्रालय नवी दिल्ली येथे आयोजित केलेल्या ८ व्या सनियंत्रण समितीच्या बैठकीतमध्ये सादर करण्यात**

आलेली माहिती मंडळाच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आली त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. १७. ०२ : मंडळाच्या मुख्यालयासाठी भाडेतत्वावर जागा खरेदीसाठी समिती स्थापन करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाचे मुख्यालय सद्य:स्थितीत कामगार आयुक्त् कार्यालयात कार्यरत आहे. सदर ठिकाणी उपलब्ध् असलेली जागा अधिकाऱ्याचे दालन व कर्मचारी यांच्या करीता अपुरी पडत आहे. मंडळाच्या मुख्यालयाकरीता स्वतंत्र जागा असणे आवश्यक आहे. मंडळाच्या मुख्यालयाकरीता भाडेतत्वावर जागा घेणेबाबतचा ठराव मंडळाच्या दि. १६.०६.२०१६ रोजीच्या बैडकीमध्ये पारित झालेला आहे.

दि. १५.०५.२०१७ रोजी मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली परिषद सभागृह, मंत्रालय येथे पार पाडलेल्या बैठकीत मंडळाच्या मुख्यालयाकरीता जागेसंबंधी झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य् विकास विभागाकडे (MSSDS) मेकर चेंबर, दक्षिण मुंबई येथे १५००० चौ. फुट एवढी जागा उपलब्ध् असून त्यामधून मंडळाच्या मागणीनुसार मुख्यालयाकरीता जागा उपलब्ध् करून देता येईल व मंडळास उपलब्ध् करून देण्यात येणाऱ्या जागेच्या क्षेत्रफळानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या दरानूसार सदर जागेचे भाडे मंडळामार्फत अदा करण्यात येईल असे मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी निर्देशित केलेले आहे.

त्याअनुषंगाने, मंडळाच्या मागणीनूसार अंदाजे ६१६० चौ. फुट एवढी जागा मेकर चेंबर, दक्षिण मुंबई येथे उपलब्ध् करून देण्याबाबतचे मा. प्रधान सचिव (कामगार-७), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय यांना प्रस्ताव दि. २५.०५.२०१७ रोजी पाठविण्यात आला.

तरी, प्रस्तुत प्रकरणी पत्र क्र. मइवइबांकाकम/मुख्या. भाडेतत्वावर जागा/२०१७/४५ दि. २५.०५.२०१७ च्या पत्रान्वये, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मुख्यालयाकरीता नरिमन पॉईंट, मेकर चेंबर येथील जागा उपलब्ध् करुन देण्याची शासनास विनंती करण्यात आली होती त्यास अनुसरून सदर जागा उपलब्ध् करुन देण्यासाठी कौशल्य् विकास व उद्योजगता विभागाकडे प्रस्ताव सादर केला असता विभागाने "सोसायटीच्या कार्यालयासाठी भाडेतत्वावर जागा संपादित करण्यासाठी प्राप्त् झालेल्या प्रस्तावांची सखोल, पारदर्शक पध्दतीने तपासणी करून शासकीय नियमानुसार शासनाकडे योग्य् ती शिफारस करण्यासाठी मा. मंत्री, कौशल्य् विकास व उद्योजगता यांच्या मान्यतेने मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य् कौशल्य् विकास व उद्योजगता विभागाच्या दि ०५.०६.२०१७

रोजीच्या पत्राद्वारे गठित करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल अद्यापही अप्राप्त् आहे. अहवाल प्राप्त् झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य् कौशल्य् विकास सोसायटीच्या कार्यालयासाठी नव्याने जागा संपादित करण्याबाबत शासनस्तरावर अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे असे अभिप्राय दिल्याचे पत्रात नमुद आहे.

तसेच कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अभिप्रायांच्या अनुषंगाने मा. मंत्री (कामगार) यांनी " महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या प्रशासकीय कार्यालयासाठी भाडेतत्वावर स्वतंत्र जागा घेण्यात यावी. जागा भाडयाने घेण्यापुर्वी नियमानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करावा" असे सदर पत्रान्वये निर्देशित केलेले आहे. तेव्हा प्रकरणी मा. मंत्री (कामगार) यांनी दिलेल्या निर्देशानुसार उचित कार्यवाही करावी, व केलेली कार्यवाही शासनास अवगत करण्याबाबत दि. ०६.०९.२०१७ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने, मंडळाच्या मुख्यालयाकरीता भाडेतत्वावर अंदाजे ५०० ते ७००० चौ. फुट (सलग अथवा ३५०० चौ फुट च्या पटीत) नरीमन पॉईंट किंवा बल्लार्ड इस्टेट, दक्षिण मुंबई या भागात किंवा त्या परीसरात तसेच उपनगरीय रेल्वेस्थानकापासून किमान ३ कि.मी. च्या परिसरात असणाऱ्या कार्यालयांना प्राधान्य् देण्याबाबत तसेच मंडळासाठी ५ चारचाकी वाहनांचे पार्किंग व २ दुचाकी वाहनाचे पार्किंग असलेले कार्यालय घेण्यासाठी दि.२३.१०.२०१७ रोजीच्या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती व त्याबाबतची ई-निविदा अपलोड करण्यात आलेली आहे. तसेच, याबाबत ई-निविदा प्री-बीड बैठक दि. ३१.१०.२०१७ रोजी घेण्यात आली आहे. सदर निविदेस मिळत असलेला कमी प्रतिसाद विचारात घेवुन मंडळाकडुन वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे, शेवटची मुदत दि. ६ जानेवारी २०१८ पर्यंत आहे.

मंडळाच्या मुख्यालयाकरीता भाडेतत्त्वावर जागा घेण्याबाबत प्रसिध्द ई-निविदे च्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत असुन याबाबत प्राप्त् होणाऱ्या निविदेतील जागांची पाहणी करणे, योग्य जागेची निवड, प्राप्त् दराबाबत वाटाघाटी करण्याकरीता खालील प्रमाणे समिती गठित करणे प्रस्तावित आहे.

**मुख्यालयासाठी भाडयाच्या जागेकरीता समिती.**

| अनु क्र. | पदाधिकारी/अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार | **अध्यक्ष** |

| | | |
|---|---|---|
| | कल्याणकारी मंडळ, मुंबई | |
| २ | कामगार आयुक्त्, महाराष्ट्र राज्य | **सदस्य** |
| ३ | उपसचिव कामगार विभाग | **सदस्य** |
| ४ | मंडळाचे कामगार प्रतिनिधी पैकी एक | **सदस्य** |
| ५ | मंडळाचे मालक प्रतिनिधी पैकी एक | **सदस्य** |
| ६ | सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | **सदस्य सचिव** |

मंडळाच्या मुख्यालयाकरीता करावयाच्या उपरोक्त् कार्यवाहीच्या अनुषंगाने प्रस्तावित समितीमध्ये योग्य तो बदल करून समिती गठित करण्यासाठीचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाच्या मुख्यालयासाठी भाडेतत्वावर जागा खरेदीसाठी समिती स्थापन करताना सदर समितीचे अध्यक्ष म्हणून मंडळाचे १. मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) २. कामगार आयुक्त्, महाराष्ट्र राज्य ३.उपसचिव (कामगार विभाग), ४. मंडळाच्या कामगार प्रतिनिधी श्रीमती वेदा आगटे व मंडळाचे मालक प्रतिनिधी श्री. श्रीपाद कुटासकर व मंडळ सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश करण्यात यावा. सदर समितीने प्रसिद्ध ई-निविदेच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या जागांची पाहणी करणे, योग्य जागेची निवड करणे, प्राप्त दराबाबत वाटाघाटी करून प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा, शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.१७.३: मंडळाच्या मुख्यालयासाठी तसेच जिल्हा कार्यालयासाठी लागणारी पावती पुस्तके, ओळखपत्र, इत्यादीसाठी ई- निविदा मागवून छपाई करण्यास मान्यता देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे स्पष्ट केले की, याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील बांधकाम कामगारांना नोंदणीसाठी व नोंदणी फॉर्म, नोंदणी शुल्क पावती, ओळखपत्रे जिल्हा कायाल्याकडुन देण्यात येतात. सदर पावती पुस्तके, नोंदणी फॉर्म व ओळखपत्रांची छपाई दि. १९.०८.२०१४ पर्यंत मुख्यालय स्तरावर शासकीय मुद्राणालयाकडून करून घेतली जात होती व जिल्हा कार्यालयांच्या मागणीनुसार पुरवठा केला जात होता. परंतु जिल्हा कार्यालयाकडुन सन २०१५-२०१६ साठीच्या मागणीनुसार आवश्यक पावतीपुस्तके व ओळखपत्रे शासकीय मुद्रणालयात निवडणुकीबाबत छपाईचे कामकाज चालु असल्याने पावती पुस्तकांचा व ओळखपत्रांची छपाई करणे शक्य नसल्याचे शासकिय मुद्रणालयाकडुन कळविण्यात आले. पावती पुस्तके व ओळखपत्रांची छपाई प्रत्येक जिल्हा प्रमुखाने आपल्याच स्तरावर छपाई करुन घेण्याचे करून निर्देश देण्यात आले होते.

तथापि दि. ०१.०२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा. कामगार आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार पावती पुस्तक व ओळखपत्रे जिल्हा कार्यालयांना मुख्यालय स्तरावरुन छपाई करुन घेऊन वितरीत करण्यात यावीत असे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार सर्व जिल्हा कार्यालयांकडुन २०१७-१८ या वर्षाच्या पावतीपुस्तके व ओळखपत्रांचे मागणी पत्र प्राप्त करुन घेण्यात आले होते.

मंडळाने दि. २८.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये संचालक शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, चर्नीरोड मुंबई यांजकडे पावतीपुस्तके व ओळखपत्रे छपाईबाबतचे एकत्रित मागणीपत्र सादर करण्यात आले होते.

तथापि, शासकीय मुद्रणालयाकडे पाठपुरावा करुनही सदर मुद्रणालयाकडून पावती पुस्तके व ओळखपत्र अद्याप छपाई करुन प्राप्त झालेली नाहीत. ओळखपत्रे व पावतीपुस्तके छपाईस होणा-या विलंबामुळे जिल्हा कार्यालयांना मागणीप्रमाणे वेळेत पावतीपुस्तके व ओळखपत्रे पुरवठा करता आलेली नाहीत त्यामुळे नागपुर, अमरावती, उस्मानाबाद, भिवंडी, इ जिल्हयांकडुन त्यांच्याकडील को-या पावती व ओळखपत्रे यांचा साठा संपुष्ठात आल्याबाबत

कळविले होते व बांधकाम कामगारांच्या नोंदणीवर परिणाम होऊ नये म्हणुन मंडळाने त्यांच्या दिं.१४/०७/२०१७ व ०१/०८/२०१७ व ०६/११/२०१७ च्या पत्रान्वये सदर जिल्हयांना मंडळाकडुन पावती पुस्तके व ओळखपत्रे छपाई करुन पुरवठा करण्यात येई पर्यंत पुर्वीप्रमाणे स्थानिक पातळीवर पावती पुस्तके व ओळखपत्रे छपाई करुन घेण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

वरीलप्रमाणे शासकीय मुद्रणालयाकडुण पावती पुस्तके व ओळख पत्रांची छपाई करण्यास होणारा विलंब व त्यांचा बांधकाम कामगारांच्या नोंदणी वाढविण्यावर होणारा परिणाम पाहता खालील दर्शविल्याप्रमाणे मुख्यालयास, विभागीय व जिल्हा कार्यालयांस पावती पुस्तके, ओळख पत्रके, नोदंणी फॉर्म व कार्यालयास आवश्यक असणारे लेखनसामुग्री छपाई करुन घेणे आवश्यक आहे. प्रस्तावीत छपाईचा तपशिल खालीलप्रमाणे

| **अनु क्र.** | **छपाईचा तपशिल** | **वार्षिक छपाईचे परिमाण** | **छपाईचा दर(रुपये)** | **अंदाजित खर्च (रुपये)** |
|---|---|---|---|---|
| १ | बांधकाम कामगारांची ओळखपत्रे | ६,००,००० | १६/- | ९६,००,०००/- |
| २ | माहिती पुस्तिका | २,००,००० | ३०/- | ६०,००,०००/- |
| ३ | पावती पुस्तके (१०० पावत्यांचे १ पुस्तक) | २१,००० | १३०/- | २७,३०,०००/- |
| ४ | नोंदणी फॉर्म (३ पानांचा १ फॉर्म) | ६,००,००० | २.५० | १५,००,०००/- |
| ५ | लेटर हेड (१००पानांचे १ पुस्तक) मराठी/इंग्रजी | ६० | ४००/- | २४,०००/- |
| ६ | फाईल्स् कव्हर | ६०० | ३०/- | १८,०००/- |
| ७ | मिटींग फोल्डर | ७०० | ३/- | २१००/- |
| ८ | मिटींग पॅड | ४०० | ४/- | १६००/- |
| ९ | देयक नमुना | ५०० | ३/- | १५००/- |
| १० | निर्देश पत्र | ७०० | २/- | १४००/- |
| ११ | व्हाउचर बुक(१०० पावत्यांचे १ पुस्तक) | १० | १३०/- | १३,००/- |
| १२ | राईटींग पॅड | ३०० | ४/- | १२००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | अधिकारी/कर्मचारी ओळखपत्र | ६० | १६/- | ९६०/- |
| १४ | वार्षिक अहवाल | ४०० प्रति | २०० | ८००००/- |
| | **एकुण** | | | **१,९९,६२,०६०/-** |

वरील प्रमाणे मंडळाचे मुख्यालय विभागीय व जिल्हा कार्यालयास पावती पुस्तके, ओळखपत्रे,नोंदणीफॉर्म, माहिती पुस्तिका व कार्यालयीन लेखनसामुग्री छपाई करून घेण्यास अंदाजित रु. **१,९९,६२,०६०/-** एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी, वरील प्रमाणे आवश्यक लेखनसामुग्री ई-निविदा पध्दतीने छपाई करुन घेण्यासाठी संस्था निश्चित करण्याबाबत मंडळाच्या मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाच्या मुख्यालयासाठी तसेच जिल्हा कार्यालयासाठी लागणाऱ्या प्रस्तावित छपाई ई-निविदा मागवून करण्यास व त्यासाठी रु. २.५० कोटी (कर वगळून) एवढ्या अंदाजित खर्चास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.१७.४: सन २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखा व आयकर विषयक कामकाजासाठी सनदी लेखापालांची नियुक्ती करण्याबाबत**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाच्या दिनांक ०२.११.२०१५ च्या ठरावानुसार सन २०११-१२ ते सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे मंडळातील अकाऊंट्स मेंन्टेन करणे, ऑडीट करणे व बँक रिकन्सिलेशन, टी.डी.एस विषयक कामकाज करणे, ऑडीटींग करणे इ. कामांसाठी मंडळावर बाहययंत्रणेद्वारे सनदी लेखापालांची नियुक्ती करण्साठी ३ दरपत्रक मागवून सर्वात कमी दर असलेल्या मे. सतीश बडवे ॲन्ड कंपनी यांची दिनांक १६.०३.२०१५ अन्वये नियुक्ती करण्यात आली होती.

त्यानुसार मे. सतीश बडवे ॲण्ड कंपनी यांनी सन २०११-१२ ते २०१४-१५ पर्यत अकांन्टींग व डेटा इंट्रीचेकाम पुर्ण करण्यात आलेले आहे. तसेच मंडळाच्या दिनांक २३.०३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सन २०१५-१६ व २०१६-१७ या आर्थिक वषाचे लेखाविषयक कामकाज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे लेखाविषयक कामकाज करण्याचे काम प्रगतीपथावर असून सन २०१६-१७ चे लेखाविषयक कामकाज अद्याप पुर्ण केलेले नाही.

मंडळाचे सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षाचे लेखा , लेखांकन व आयकर विषयक कामकाज अद्याप प्रलंबित आहे व ते पुर्ण करण्यासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या पॅनलवरील सनदी लेखापालांची सदर कामकाजासाठी नियुक्ती करण्यासाठी तीन दरपत्रके मागवून सनदी लेखापालांची नियुक्ती करणे प्रस्तावित आहे, प्रस्तावित दोन वर्षाकरीता यथा प्रस्तावित सनदी लेखापालांच्या नियुक्तीचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: सन २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखे व आयकर विषयक कामकाजासाठी सनदी लेखापालाकडून दरपत्रके मागवून नियुक्ती करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** |
| **कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.१७.५: मंडळातील नोंदित बांधकाम कामगारास प्रतिकुटुंब ऐवजी प्रत्येक नोंदित बांधकाम कामगारांस बांधकामासाठी उपयुक्त/ आवश्यक असलेली अवजारे खरेदी करण्याकरीता रु. ५०००/- अर्थसहाय्य देणेबाबात**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, केंद्र शासनाच्या श्रम एवं रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.२७.०२.२०१४ च्या पत्रान्वये नोंदीत पात्र बांधकाम कामगाराच्या प्रती कुटूंबास बांधकामासाठी उपयुक्त/ आवश्यक असलेली अवजारे खरेदी करण्याकरीता मंडळाकडून दर तीन वर्षातून एकदा रू.५०००/- इतके अर्थसहाय्य देण्याबाबत निर्देशित केलेले आहे.

त्यानुसार मंडळाच्या दि.०२.११.२०१५ रोजीच्या बैठकीत सदर विषयावर सविस्तर चर्चा करून मंडळातील नोंदीत लाभार्थी कामगारांच्या प्रति कुटूंबास दर तीन वर्षातून एकदा रूपये ५ हजार अवजारे/ हत्यारे खरेदी करण्याकरीता अर्थसहाय्य देण्यात यावे असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आलेला होता. त्यानुसार सदर योजनेचा प्रस्ताव शासनाकडे दि.११.१२.२०१५ मान्यतेकरीता सादर करण्यात आला होता. त्यानुसार शासनाने दि.०५.०४.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर योजनेस मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने दि.२९.०४.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हा कार्यालयांना सदर योजना बांधकाम कामागरांसाठी राबविण्याबाबत आदेशीत करण्यात आले होते. दि.२९.०४.२०१६ रोजीच्या कार्यप्रणालीमध्ये जो बांधकाम कामगार कमीत कमी ०३ वर्षे मंडळाकडे नोंदीत आहे अशा बांधकाम कामगारास सदर योजनेचा लाभ देण्यात यावा, असे नमूद आहे.

दरम्यान, सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामागरांची मंडळाकडे ०३ वर्षे सलग नोंदणी असावी, अशी अट सदर योजनेच्या कार्यप्रणालीत घालण्यात आलेली असल्याने व मंडळाकडील सर्वच नोंदीत बांधकाम कामगारांना सदर योजनेचा लाभ मिळणार नसल्याने, याबाबत बऱ्याच लोकप्रतिनिधी तसेच कामगार संघटनानी नाराजी व्यक्त करून प्रत्येक नोंदीत बांधकाम कामगारांस या योजनेचा लाभ सुरवातीस देण्यात यावा व पुढील ०३ वर्षानंतर लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगारांची मंडळाकडे सलग ०३ वर्षे नोंदणी असावी, अशी मागणी केली आहे. त्या अनुषंगाने, मंडळाच्या दि.१६.०६.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये अवजारे/ हत्यारे खरेदी करण्याकरीता रू.५०००/- अर्थसहाय्य ही योजना सर्व नोंदीत पात्र बांधकाम कामागरास लागू करण्यात यावी. तसेच, ०३ वर्षानंतर सदर योजनेंतर्गत पुन्हा लाभ घेण्यासाठी बांधकाम

कामगारांचे मागील ०३ वर्षे मंडळाकडे नुतनीकरण झालेले असणे अनिवार्य करावे, असा ठराव मंडळाने घेतलेला असून सदर योजनेचा प्रस्ताव राज्य शासनास दि.०५.०७.२०१६ रोजी सादर करण्यात आलेला होता.

त्यावर राज्य शासनाने दि.०१.०८.२०१६ अन्वये दिलेल्या आदेशान्वये केंद्र शासनास दि.०१.०९.२०१६ रोजी पत्रव्यवहार करून मार्गदर्शन मागविले होते. त्यानुसार केंद्र शासनाने दि.११.०१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाच्या कलम ६० अंतर्गत दिलेल्या दि.२७.०२.२०१४ रोजीच्या आदेशामधील परिच्छेद ०५ (v) मध्ये नोंदीत बांधकाम कामगारांना दर तीन वर्षातून एकदा अवजारे/ हत्यारे खरेदी करण्याकरीता प्रति कुटूंब रूपये ०५ हजार अर्थसहाय्य ही योजना प्रत्येक राज्यातील इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत असलेल्या सर्व बांधकाम कामगारांना सदर योजना ०३ वर्षातून एकदा लागू असल्याबाबत नमूद केले आहे. तसेच, याबाबत राज्य शासनास त्यांना योग्य वाटेल तो निर्णय त्यांनी त्यांचे स्तरावर घ्यावा, असेही कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने सदर योजनेचा सुधारित प्रस्ताव राज्य शासनास दि.१७.०१.२०१७ व दि.१४.०२.२०१७ रोजी सादर करण्यात आला होता.

उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने उद्योग, उर्जा व कामगार विभागाने शासन निर्णय क्र. इबाक-२०१५/९२०/प्र.क्र.३१८/काम-७ दि.०१.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयास अनुसरून योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत दि.०२.०३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हा सूचति करण्यात आलेले आहे. आजपावेतो मंडळामार्फत सुमारे ९६२० बांधकाम कामगारांना४.८१ इतक्या रक्कमेचे लाभ बांधकाम कामगारांना अदा करण्यात आलेले आहेत.

सदर योजनेचे लाभ हे कुटूंबातील एकाच व्यक्तीस देय असल्याने अन्य बांधकाम कामगारांना सदर योजनेचे लाभ मिळत नसल्याबाबत अनेक बांधकाम कामगार संघटनानी योजनेत त्रुटी असल्याचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्याअनुषंगाने मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारास प्रतिकुटूंब ऐवजी प्रत्येक नोंदीत बांधकाम कामगारांस बांधकामासाठी उपयुक्त/ आवश्यक असलेली अवजारे खरेदी करण्याकरीता रू.५०००/- अर्थसहाय्य देण्याबाबत मंडळाच्या निर्णयार्थ प्रस्ताव सादर.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळातील नोंदित बांधकाम कामगाराच्या प्रतिकुटुंब ऐवजी प्रत्येक नोंदित बांधकाम कामगारांस बांधकामासाठी उपयुक्त/ आवश्यक असलेली अवजारे/ हत्यारे खरेदी करण्याकरीता रु. ५०००/- अर्थसहाय्य देण्यात यावे. शासन निर्णय दिनांक ०१.०३.२०१७ मध्ये तशी सुधारणा करण्याबाबतचा प्रसताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** |
| **कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.१७.६: मंडळाच्या दिनांक १८.०७.२०१७ रोजीच्या बैठुकीतील मंजूर सुधारित आराखडयातील सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाची वेतन श्रेणी अपर कामगार आयुक्त (श्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ७६००) ऐवजी सहआयुक्त (रु. ३७४००-६७०००ग्रेड पे ८७०० अशी वाढ करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाच्या दि.१८.०७.२०१७ रोजीच्या बैठकीत ४१९ पदांकरीत सुधारित आराखडा बनविण्याकरीता खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

**ठराव:** मंडळाचे मुख्यालयकरीता ५१, ६ प्रादेशिक कार्यालयाकरीता १८ व ४० जिल्हा कार्यालयाकरीता ३२० असे एकूण ४१९ पदांच्या सुधारित आकृतीबंधास व अंदाजित अपेक्षित वार्षिक खर्च रु.१०,१३,०५,४१८/- एवढया रक्कमेस सर्वानुमते मान्यता देण्यात यावी व सुधारित आकृतीबंधात प्रस्तावित ज्या पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करणे आवश्यक आहे ते तयार करून सुधारित आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम मंजूरीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बांधकाम कामगारांकरीता २४ कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली जाते. तसेच, मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता राबवावयाच्या योजनांमध्ये वाढ होत असून योजनांच्या खर्चात देखील वाढ होत आहे. तसेच प्रोदशिक कार्यालयाचे प्रमुख कामगार उप आयुक्त किंवा अप्पर कामगार आयुक्त या दर्जाचे असल्याने मंडळाच्या सचिव/ मुख कार्यकारी अधिकारी हे पद अपर कामगार आयुक्त (श्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ७६००) या पदाऐवजी सह आयुक्त (श्रेणी ३७४००-६७००० ग्रेड पे ८७००) अशी सुधारणा करून दिनांक १८.०७.२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूर मंडळाचा सुधारित आकृतीबंध शासन मान्यतेस सादर करणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: मंडळाच्या दिनांक १८.०७.२०१७ रोजीच्या बैठकीतील मंजूर सुधारित आराखडयातील सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाची वेतन श्रेणी अप्पर कामगार आयुक्त (श्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ७६००) ऐवजी सह आयुक्त (रु.**

३७४००-६७०००ग्रेड पे ८७००) अशी श्रेणीवाढ करण्यात यावी व सुधारित आराखडा शासन मान्यतेकरीता सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.१७.७.: नोंदित बांधकाम कामगारांसाठी आरोग्य तपासणी करण्याबाबत.**

मंडळाचे मा. अध्यक्ष महोदय यांनी असे सुचित केले की, नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करणे आवश्यक आहे. आरोग्य तपासणीमध्ये बांधकाम कामगारांन कोणताही गंभीर आजार असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत वेळीच उपचार सुरु करून सदर आजार भविष्यात गंभीर स्वरुप धारण करणार नाही याची दक्षता घेता येईल. सदर आरोग्य तपासणीसाठी त्या क्षेत्रातील अनुभवी संस्थेची नेमणूक करणे योग्य राहील.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मंडळामार्फत कॅम्प आयोजित करून सदर कॅम्पमध्ये आरोग्य तपासणी करण्यात यावी. आरोग्य तपाणीत आढळून येणाऱ्या गंभीर आजाराबाबत करावयाची उपाययोजना बाबतचा आराखडा तयार करावा. आरोग्य तपासणीकरीता त्या क्षेत्रातील अनुभवी संस्थेची नेमणूक करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. सदर योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** |
| **कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

सर्व विषयांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर मंडळ सचिव यांनी मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांचे व सर्व उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.

******************